म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय काव्य
दा. क्र. १२२९०

१२२९०

काठपुतळी.

IRBK-0112290

१२२२०

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
दा. क्र. 12220 नों. दि. ....................
वि. ....811:91 क्र. ....................

| | | |
|---|---|---|
| १ | लाकडाच्या तुकड्याचा प्रताप | १ |
| २ | पिनोशिओ | ९ |
| ३ | कठपुतळ्याचा खेळ | १८ |
| ४ | डाकूंचा हल्ला | ४० |
| ५ | परीताई | ५७ |
| ६ | प्राणसंकटे | ७० |
| ७ | मेहनतपुर ते मूर्खनगरी | ७९ |
| ८ | गाढवाचा नाच | ९१ |
| ९ | आनंदी आनंद गडे | ९६ |

## १. लाकडाच्या तुकड्याचा प्रताप

बाल मित्रांनो,

फार जुन्या काळातली कथा आहे ही.

एक होता ऽ - - -

" राजा " तुम्ही एकदम म्हणाल. पण नाही. ही जी कहाणी आहे ती एका गोष्टीची आहे. तर मी काय सांगत होतो - - -

एक होता - - - लहानसा लाकडाचा तुकडा. हसू नका हं. अगदी क्षुल्लक जळाऊ लाकडाचा तुकडा असतो ना तसाच समजा तो. कुठून आला, केव्हां आला हे मात्र कुणालाच माहित नाही. परन्तु एके दिवशी अन्तोन नांवाच्या एका म्हाताऱ्या सुताराच्या दुकानांत तो पडलेला आढळला. सुताराची नजर सहज त्या तुकड्यावर गेली. त्याला एकदम आनंद झाला.

IRBK-0112290

IRBK-0112290

जणू कांहीं त्याच्यावरचं एक संकटच टळलं. हवेत हात उंचावून तो आनंदाने म्हणाला, " अरे वा, दरिद्री खराच, पण काय नशीबवान आहे मी ! या तुकड्या-पासून मी एखाद्या टेबलाचा पाय सहज बनवू शकेन. "

त्याने लगेच आपले लाकूड तासण्याचे हत्यार बाहेर काढले. आणि तो तुकडा तासण्यास सुरवात केली. इतक्यात त्याचे हात एकाएकी थांबले. त्याला कुठून तरी हळू आवाजातले बोलणे ऐकू आले.

" अग आई, इतक्या जोरात नको रे ! "

सुताराने घाबरून इकडे तिकडे पाहिले. पण आजूबाजूला चिटपांखरूही नव्हते. दुकानातही तो अगदी एकटाच होता. त्याची हत्यारे आणि दोन चार लाक-डाचे तुकडे याशिवाय काहीही नव्हते. कदाचित आप-ल्याला भास झाला असेल असा विचार करून तो पुनः कामाला लागला. त्याचे हत्यार पुनः लाकडावरून फिरू लागले. परन्तु पुनः अगदी रडक्या आवाजांत कुणी तरी म्हणाले,

" अरे, जरा हळू तरी. फार जोरात लागतय रे."

आता मात्र सुतार अगदी गडबडून गेला. घाबरून त्यानें सर्वत्र शोधाशोध केली. परंतु खरोखरच कुठेच कुणीही नव्हते. नक्की भासच. सुतारानें मनाची

समजूत घालून मन थोडे शांत करून घेतले. आणि पुनः जोरजोराने त्याने लाकूड तासण्यास सुरवात केली. पुनः आवाज येतच होता. अगदी कळवळून कोणी तरी बोलत होते. पण आमच्या सुतारमामांनी तिकडे लक्षच दिले नाही. मनाप्रमाणे त्या लाकडाच्या तुकड्याला आकार दिल्यानंतर त्याला गुळगुळीतपणा व सुबकता यावी म्हणून एक पॉलीश कागद घेऊन तो तुकडा घासण्यास सुरवात केली. अगदी हळूवारपणे सुताराचा हात त्या तासलेल्या लाकडी तुकड्यावरून फिरू लागला. "ही ऽ ही ऽ ही ऽ ही ऽऽऽ"

कुणाच्या तरी हंसण्याचा आवाज आला.

"जरा लवकर आटप. मला फार गुदगुल्या होताहेत."

हे शब्द ऐकल्या बरोबर सुतार चांगलाच बावरला ही भुताटकी तर नाही ना ? अशी भिती त्याच्या मनात उभी राहिली. थरथरत्या हातानेच त्याने तो तुकडा दूर भिरकावला आणि तो विचार करतच उठून उभा राहिला. तो अगदी घामाघूम झाला होता.

हा आवाज लाकडाच्या तुकड्यातूनच आला होता हे नक्की. पण त्याचा विश्वास बसेना. लाकडाच्या तुकड्यातून आवाज येणे कसे शक्य आहे. मग हा आवाज

नक्की कोठून आला ? का कुणी मुद्दाम – – ! त्याची विचारमालिका मध्येंच तुटली. कारण बाहेरून कोणी तरी दार वाजविले.

" या, या, कोण आहे आंत या." सुतार आंतू–नच ओरडला.

धाडकन् दार ढकलून आणि उडी मारूनच एक माणूस आंत घुसला. त्या माणसाचं नांव होते 'जेप्पेत्तो', पण गल्लीतली लहान मुलें त्याला ' पोलेन्दिना ' म्हणून चिडवीत असत. ' पोलेन्दिना ' म्हणजे काय बुवा ? पोलेन्दिना म्हणजे ' हलवा '. आपणही त्याला पोलेन्दिनाच म्हणू हं ऽ ! पण थांबा. तशी हाक मारली तर त्याला राग येतो बरं का ? जरा जपून.

तर काय झालं पोलेन्दिनाने आंत आल्याबरोबर एक छानसा नमस्कार केला. तो म्हणाला, " नमस्ते सुतारकाका." आज मला छानशी कल्पना सुचली आहे. अगदी मजेशीर आहे ती."

" बोल काय आहे तुझी कल्पना." सुताराने हंसत हंसत विचारले. कारण त्यांत कांहीतरी जगावेगळं असणार हे त्याला माहीतच होते.

" हे पहा सुतारकाका, हसूं नका. माझी कल्पना तुम्ही ऐकलीत कीं तुम्हालाही पटेल कीं त्यामुळें माझी

गरीबी पार नाहिशी होईल. " पोलेन्दीना म्हणाला
" अरे पण सांग तर खरं ! " सुतार.

" हे पहा. एखादा लाकडाचा तुकडा तुम्ही मला द्या. त्याचा मी एक बाहुला बनवणार आहे. त्याला माणसाप्रमाणें डोके, नाक, कान, डोळे हात, पाय सर्व कांही अवयव असतील. अगदी कठपुतळा. तो पुतळा हसेल, बोलेल, गाणी म्हणेल, नाचेल, दंगा करेल. मग मी त्याला घेऊन गांवोगांव फिरेन. लोकांना खेळ करून दाखवीन आणि लोकांची करमणूक करीन. मग माझा कायमचा पोटाचा प्रश्न सुटेल. काय ठीक आहे कीं नाहीं माझी कल्पना " जेप्पेत्तोने उत्साहानें विचारले.

" वा, वा, वा, शाबास पोलेन्दिना एकदम ", हळूच कुणीतरी बोलले.

जेप्पेत्तोचा चेहरा एकदम पडला. निराशेनेच तो ओरडला.

" काहो सुतारकाका, तुम्हीही मला चिडवता. मला पोलेन्दिना का म्हणता ? "

" अँ ! अहो मी तर काहीच म्हटले नाही. मी तुमच म्हणणं ऐकत होतो. " सुतारकाका आश्चर्याने म्हणाले.

" मग काय मीच मला पोलेन्दिना म्हणून चिडवले की काय ? मला तुम्ही चिडवलत ? " जेप्पेतो म्हणाला.

" नाही, मी मुळीच चिडवल नाही. " – सुतार

" हो हो, तुम्हीच " – जेप्पेत्तो.

" नाही म्हणतो तर. " – सुतार.

" होच. " – जेप्पेत्तो.

शेवटी दोघांचेही चांगलेच भांडण जुंपले. भांडून भांडून दोघेही शांत झाले.

केवळ जेप्पेत्तोला खूष करण्याकरता सुतार म्हणाला,

" काय हो तुम्ही तर चांगला कठपुतळा बनविणार आहात ना ? तुमची कल्पना फारच छान आहे हं. पण काय हो, तुम्ही माझ्याकडे कशासाठी आला होता ? "

" सुतारकाका अडचण अशी, कीं – तो कठपुतळा बनविण्याकरता मला थोडेसे लाकूड हवे होते. " पोलेन्दिना म्हणाला.

" अस होय " सुतार.

" तर तुमच्याजवळ एखादं टाकावू, फालतू लाकूड असेल तर मला द्या ". पोलेन्दिनाने विनवणी केली.

" हो हो, देतो कीं " असं म्हणून सुताराने भीतीने फेकून दिलेला तो मघाचा लाकडाचा तुकडा

आनंदाने उचलला. इतक्यात एक अघटित गोष्ट घड.ली तो तुकडा आपोआपच सुताराच्या हातांतून निसटला आणि नेमका पोलेन्दिनाच्या पायावर जाऊन पडला. पोलेन्दिना अेकदम ओरडला.

" अहो काका, अस काय करताय ! माझा पाय मोडायचा विचार आहे काय तुमचा ? "

" नाही हो मी कांहीं केलं नाही. " सुतारकाका अजीजीनं म्हणाला. कारण तोहि पुनः बावरून गेला होता.

" नाही काय ! तुम्ही तो तुकडा केवढ्या जोराने माझ्या पायावर फेकलात. "

" नाही हो. मी मुद्दाम नाहीं फेकला. तो आपला आपणच तुमच्या पायावर येऊन पडला. " सुतार.

" काय काका ! तुम्ही सुद्धा खोटं बोलायला लागलात ना ! आता तर तुम्ही लाकूड फेकलत. " पोलेन्दिना रागावला.

" मी नाही तुम्हीच खोटं बोलता. " आपल्याला खोटं ठरवल्याबद्दल सुताराला राग आला.

" तुम्हीच मारून आणखी वर मला खोट ठरवता." पोलेन्दिना संतापला.

तूच खोटारडा आहेस. चालता हो इथून" सुतारकाकाने त्याला बजावले.

सुतारकाकाच्या नांवाने ओरडत आणि बडबड करीत पोलेन्दिनाने लाकूड उचलले आणि तो आपल्या घरी परतला.

# २. पिनोशिओ

जेप्पेतोचे घर म्हणजे दारिद्र्याचे खरेखुरे दर्शन. परंतु खोलीत कमी प्रकाश असल्याने त्याचे दारिद्र्य थोडे फार झाकले जाई. एक मोडकी कॉट, जीर्ण झालेली खुर्ची आणि डुगडुगणाऱ्या पायावर नाईलाजाने उभे राहिलेले टेबल. एका कोपऱ्यांत एक तसबीर एवढेच नजरेत भरण्यासारखे सामान त्याच्या घरांत होते.

जेप्पेतोने घरी आल्यावर आपली लाकडे कापण्याची हत्यारे काढली, आतां त्या लाकडाच्या तुकड्यापासून एक सुंदर पुतळा बनवायचा. एवढा एकच विचार त्याच्या डोक्यांत होता. पण त्या पुतळ्याला कोणत्या नांवाने हाक मारायची, हा एक मोठा प्रश्नच होता. शेवटी खूप विचार केल्यानंतर त्याने त्या पुतळ्याला 'पिनोशिओ' याच नांवानें हाक मारायचे ठरविले. कारण 'पिनोशिओ' हे एक श्रीमंत माणसाचे नांव होते. हा कठपुतळाहि त्याला खूप धन मिळवून देईल, अशी त्याला आशा होती.

जेप्पेत्तो उर्फ पोलेन्दीनाने लाकडाच्या तुकड्याला आकार देण्यास सुरवात केली.



कठपुतळ्याचे प्रथम डोके घडविण्याचे काम सुरू झाले. प्रत्येक अवयव रेखीव करण्याचे पोलेन्दिनोने ठरविले होते. लाकडाच्या तुकड्याला माणसाप्रमाणें आकार देणे ही कांही सोपी गोष्ट नव्हती.

डोके व्यवस्थितपणें तयार केल्यावर त्याने पुतळ्याचे डोळे घडविण्यास सुरवात केली. अगदी काळजीपूर्वक काम करून त्यांने डोळे तर उत्तम तयार

केले. आणि डोळयांत चमक येण्याकरितां रंग भरण्यास सुरवात केली. पण . . . काय आश्चर्य. डोळयाकडे नजर लावून तो पहातच बसला. कारण त्या डोळयांनी अशी कांहीं हालचाल होत होती कीं जणू ते खरेच होते आणि पोलेन्दिनोकडे टक लावून पहात होते.

पोलेन्दिनाला हा चमत्कारच वाटला. लाकडी डोळे आणि अशाप्रकारे हालचाल करताना पाहून त्याला जराशी भितीच वाटली. पण तसाच थोडासा स्वतःला सावरून त्याने पुनः आपले काम पुढे चालू केले. डोळे तयार झाले. आता नाक. पोलेन्दिनोने कठपुतळयाचे नाकही बनविले. पण हे काय? पहाता पहाता नाक एकदम लांब झाले. इतके लांब की काही विचारूच नका. जेप्पेत्तो ते नाक पुनः पुनः कापून काढी आणि ते पुनः पुनः लांब होत असे. शेवटी बिचारा कंटाळला आणि पुतळयाचे नाक कापण्याचे सोडून त्याने त्याचे तोंड बनविण्यास सुरवात केली. तोंड बनविण्याचे काम पूर्ण झालेहि नव्हते तोच तो पुतळा एकदम हसू लागला.

ही ऽ ऽ ही ऽ ऽ ही ऽ ऽ हा ऽ ऽ हा ऽ ऽ हा ऽ ऽ

पुतळा खदखदून हसू लागला

" गप बैस. असा हसू नकोस. " जेप्पेत्तो रागाने ओरडलाच. आणि त्याने हातही उगारला. माराच्य



भितीने त्या पुतळ्याचे हसणे एकदम बंद झाले. जेप्पेत्तोने स्थिर मनाने पुनः पुतळ्याचे उरलेले अवयव बनविण्याचे काम सुरू केले. गळा, खांदे, पोट आणि दंड एवढे बनविल्यावर त्याने पुतळ्याचे हात तयार केले. हात तयार झाल्याबरोबर पुतळ्याने आणखी पुढे मजल मारून जेप्पेत्तोचे केसच ओढण्यास सुरवात केली. त्याच्या डोक्यावरची टोपी पुतळ्याने काढून टाकली. "अरे काय चालवलं आहेस तू हे ? देऊन टाक माझी टोपी." जेप्पेत्तो रागाने म्हणाला

परन्तु पिनोशिओने म्हणजे लाकडी पुतळ्याने टोपी परत देण्याऐवजी स्वतःच्याच डोक्यावर घातली. जेपेत्तोने

शेवटी दोन चार तडाखे दिले. पण लगेच त्याचेही त्याला प्रतिउत्तर मिळाल्याने त्याने अपले लक्ष पुढील कामावर केन्द्रित केले. त्याने पिनोशिओसाठी पाय बनविले पण पाय तयार झाल्याबरोबर पिनोशिओने जेपेत्तोच्या नाकावर एक जोराची लाथ मारली. जेपेत्तो कळवळला. त्याला वाईट वाटले. पण त्याने विचार केला. ' मी प्रथम त्याला मारले. म्हणून त्याने आतां आपल्याला लाथ मारली. त्यानें पिनोशिओला चाला-यला शिकविले. पहातां पहातां पिनोशिओ चालायला शिकला. आणि पळूही लागला. जेपेत्तोने त्याला पकडण्याचा प्रयत्न केला पण त्यालाही ते शक्य झाले नाही. तो रस्त्यानें पिनोशिओच्या मागून पळू लागला. पण पिनोशिओचा वेग फारच होता. अखेरीस जेपेत्तोनें ओरडूनच लोकांना इशारा केला.

"पकडा, पकडा त्याला पकडा." जेपेत्तो ओरडू लागला. लोक इकडे तिकडे पाहू लागले. एक लाकडाचा पुतळा पळतांना पाहून लोकांच्या आश्चर्याला सीमाच राहिली नाही. त्यांना मौजच वाटली आणि हा फुकटचा खेळ पहात ते रस्त्यातच उभे राहिले व हंसू लागले. काय मौज पहा!

पण इतक्यांत काय झालें. एका शिपायाने हा गोंधळ ऐकला आणि त्याने पिनोशिओला अडविले. पिनो-

शिओने त्या शिपायाच्या पायामधून पळून जाण्याचा प्रयत्न केला. पण शिपाई कसला वस्ताद. त्याने पिनोशिओचे नाक पकडले. पिनोशिओचा नाईलाज झाला. इतक्यांत जेप्पेत्तोही तेथे आलाच. आणि रागानें म्हणाला,

" थांब. आतां तुझे चांगलेच कान उपटतो.

पण काय गमंत जेप्पेतोने त्याला कानच बनविले नव्हते. त्याची चूक त्याच्या लक्षांत आली आणि त्याने पिनोशिओची मानगुटी पकडली. त्याने पिनोशिओला फरफटत ओढण्यास सुरवात केली. पिनोशिओने सुटण्यासाठी हिसके दिले आणि शेवटी तो जमिनीवर आडवा झाला. पण जेपेत्तो बरोबर घरी जाण्यास तो तयार होईना. आजूबाजूला बघ्यांची मोठी गर्दी जमली. त्यांना पिनोशिओची दया आली. त्यातलाच एक माणूस म्हणाला, " काही झाले तरी हा लाकडाचा पुतळा. त्याची घरी जाण्याची इच्छा नाहीं आणि या म्हाताऱ्याच्या अविर्भावावरून वाटते की हा म्हातारा त्या पुतळ्याचे प्राण घेईल.

शेवटी जमलेल्या लोकांनी शिपायाला समजावून सांगितले. आणि पिनोशिओला सोडविण्याची विनंती केली. शिपायानेही पिनोशिओची सुटका तर केलीच पण जेप्पेत्तोला मात्र पकडून नेले. जाता जाता जेप्पेत्तो पुतळ्याला उद्देशून निराशेने म्हणाला.

" अरे वेड्या मुला, मीं तुला किती कष्टाने तयार केले. ही साधी गोष्टहि तू विसरून गेलास. मी तुला एक चांगला माणूस बनविण्याचा प्रयत्न केला. पण तू पहिल्यापासूनच खोडकर निघालास."

पण पिनोशिओ हे ऐकण्याकरिता थांबलाही नव्हता. सुटका झाल्याबरोबर तो पळून गेला. आणि शेवटी तो घरी परत आला. दार उघडेच होते. तो घरात शिरला आणि त्याने दार आतून बंद केले. समाधानाने विश्रांती घेण्यासाठीं तो जमिनीवर बसला.

थोड्याच वेळात एक फुलपाखरू आत येऊन गाणे गुणगुणू लागले. पिनोशिओला राग आला. तो ओरडला, " इथे गोंगाट करू नको. ही माझी खोली आहे. तू इथून निघून जा."

पाखराने आश्चर्याने डोळे वटारून त्याच्याकडे पाहिले आणि म्हणाले, " अरे तुला काय माहीत ? गेली शंभर वर्षे मी या खोलीत रहात आहे. तरीहि मी जातो. पण तुला एक उपदेशाची गोष्ट मात्र सांगून ठेवतो, की जी मुले घरातून पळून जातात त्यांचे कधीही भले होत नाही. ते जगात कसलंही काम करू शकत नाहीत आणि अखेरीस त्यांना पश्चाताप करावा लागतो."

त्यावर पिनोशिओ हसून म्हणाला, " जाऊ दे तुझा उपदेश. मी तर इथून उद्याच निघून जाणार

आहे. नाहीतर हे लोक मला शाळेत जायला लावतील. मला तर अभ्यासाची आवड नाही. मला खूप खेळावसं वाटतं."

"बरोबरच आहे. शेवटी तू लाकडाचाच तुझे डोकेहि लाकडीच. तुला कसे पटावे माझे बोलणे" पांखरू म्हणाले. पिनोशिओला या बोलण्याचा राग आला. जवळची हातोडी उचलून त्याने ती फुलपांखराच्या दिशेने भिरकावली. फुलपांखराने उडून जावे एवढाच त्याचा उद्देश होता. पण झाले भलतेच. हातोडी नेमकी फुलपांखराच्या डोक्यावर बसली आणि बिचारे मरून गेले.

पिनोशिओला त्याबद्दल खूप वाईट वाटले. परन्तु भुकेने तो व्याकूळ झाला होता. त्यामुळे त्याला शोक करायला वेळच नव्हता. त्याचे लक्ष कोपऱ्यात गेले. तेथे एका शेगडीवर काही तरी शिजत होते तो जवळ गेला पण हाय! ती शेगडी नसून ते एक चित्र होते. शेगडीचा तो फोटो होता त्याला फार वाईट वाटले अन् त्याचे नाक वाहू लागले. जेव्हां जेंव्हां पिनोशिओला दुःख होत असे तेव्हां तेव्हां त्याच्या नाकातून पाणी येई. त्याने खोलीतला कोपरान् कोपरा शोधला पण त्याला एकही खाण्याची वस्तू मिळाली नाही. अगदी निराशेने तो खोलीतच येरझारे घालू लागला. अचानक

त्याला कोंबडीचे अंडे सापडले. त्याला आनंद झाला. या अंड्याचे काही तरी करावे म्हणून त्याने चूल पेटवली. आमलेट बनविण्याची तयारी केली. हलकेच त्याने अंड्याचा एक टवका काढला. परन्तु त्यातून एक पिलूच बाहेर पडले. पिल्लाने बाहेर आल्याबरोबर आपल्या उपकारकर्त्या पिनोशिओला अत्यंत आदराने सलाम केला आणि अदबीने विचारले, " अंडे फोडायला आपल्याला काही त्रास तर झाला नाही ना ? बरय्, मी जातो. नमस्ते." इतकं बोलून ते पिल्लू पंखानी उडतच खिडकीतून बाहेर पडले.

बिचारा पिनोशिओ भूकेने व्याकूळ झाला. त्याला आतां त्या मघाच्या फुलपांखरांचा उपदेश आठवू लागला. खरच मी जर घरांतून एकटा पळून गेलो नसतो तर किती बरे झाले असते. आता जर माझे बाबा इथे असते तर असा भुकेने का बर तडफडलो असतो ! पण आता उपयोग काय होता. योग्यवेळीं विचार न केल्याने त्याचे हे हाल झाले होते. पण आता काय करणार ?

घरांत तर खायला कांहीच नव्हते. शेवटी पिनो-शिओने विचार केला. आतां घरांतून बाहेर पडावे. नशीबाने एखादा दयाळू माणूस भेटलाच तर बरे. निदान एखादा भाकरीचा तुकडा तरी मिळेल.

## ३. कठपुतळ्याचा खेळ

थंडींचे दिवस असल्याने बाहेर कडाक्याची थंडी पडली होती. वादळाचीही शक्यता होती. अधून मधून विजाही चमकत होत्या. सर्वत्र अंधार झाला होता. भयाण रात्र होती ती. पिनोशिओला वादळाची भीती वाटत होती. पण भूक इतकी लागली होती कीं अंधाराची व वादळाची पर्वाही न करतां तो गांवाकडे धांवत सुटला. पण तिथेही त्याची निराशाच झाली. सर्व घरांची दारे-खिडक्या बंद होती. रस्त्यावर चिटपांखरूही नव्हते. शेवटी अगदी नाईलाजानें पिनोशिओला एका म्हाताऱ्या माणसाने एक खिडकी उघडून बाहेर डोकावून रागातच विचारले, "काय आहे? इतक्या रात्री कशाकरतां आलास?"

"कृपा करून मला थोडेसे खायला द्या हो" पिनोशिओ व्याकूळ होऊन म्हणाला.

"थांब हं जरा, देतो." असं म्हणून म्हातारा आंत गेला. परंतु त्याला वाटले, हा कुणीतरी लुच्चा मुलगा

असावा. जाणून बुजून त्रास देण्यासाठीं आला आहे. जरा त्याला धडा शिकवला पाहिजे. असा विचार करून तो पुनः खिडकीत आला, अन् म्हणाला,

"जरा तुझी टोपी इकडे कर."

पिनोशिओने मोठ्या आशेनें टोपी पुढें केली. परंतु वरून एक बादलीभर थंड पाणी तीवर पडले. पिनोशिओही चांगलाच भिजून गेला. त्यानें वर पाहिले पण तो म्हातारा खिडकी बंद करून आंत गेला होता. बिचारा पिनोशिओ थंडीने कुडकुडू लागला. त्याच्या डोळ्यातही पाणी आलं. तो तसाच पळत घरीं परतला.

थंडीने त्याचे पाय अगदी गारठून गेले होते. त्यानें पाय शेकण्यासाठीं शेगडीवर ठेवले. आणि त्याला झोप लागली. त्याला इतकी गाढ झोप लागली की शेगडी-तील विस्तवानें त्याचे पायही जळून गेले. अगदी राख झाली तरी त्याला शुद्ध राहिली नाही. सकाळ झाली. तरीहि पिनोशिओला जाग आली नाही. कुणाच्या तरी आवाजाने त्याला जागे केले. जांभई देतच त्यानें विचारले,

"कोण आहे रे बाबा ?"

"मी आहे. जेप्पेत्तो."

"वा. पपा तुम्ही." असे म्हणून दार उघडण्यासाठी तो उठला. पण एकदम खालीच कोसळला. कारण त्याचे पायच जाग्यावर नव्हते. त्याच्या लक्षात ही गोष्ट आत्ता आली. जेप्पेत्तो बाहेरून दार ठोठावीतच होता. सुस्कारा सोडीतच पिनोशिओ म्हणाला, "पपा मी दार उघडूच शकत नाही कारण माझे पायच कोणी तरी खाल्ले आहेत."

"तुझे पाय कोणी खाल्ले" जेप्पेत्तो.

"मांजराने" समोरच्या मांजराकडे पहात पिनोशिओ उत्तरला.

"उगाच मला त्रास देऊ नकोस. अगोदर दार उघड" जेप्पेत्तो चिडून म्हणाला.

अखेर पिनोशिओ रडू लागला. तेव्हां जेप्पेत्तोला काही तरी गौडबंगाल असल्याचे खरे वाटले, आणि तो खिडकीतून आत आला. तो पिनोशिओवर चिडला होता. पण खरी परिस्थिति पाहिल्यावर त्याला दया आली.

"तुझे पाय कसे जळाले रे"

"मला काय माहित पपा" असे म्हणून फुलपाखराच्या उपदेशापासून तो आता पर्यंतची सर्व हकीकत पिनोशिओने जेप्पेत्तोला सांगितली, आणि म्हणाला.

"आता तर माझे पायही नाहीत, माझे कसे होणार !" तो जोरजोराने रडू लागला.

जेप्पेत्तोला समजूच चुकले की बिचारा पिनोशिओ अद्यापि भुकेलेला आहे. जेप्पेत्तोने आपल्या खिशातून तीन लाडू काढले आणि पिनोशिओला दिले.

"पपा हे मला फोडून द्या ना."

"काय? किती नखरे करतोस" जेप्पेत्तो ओरडला पण त्याने पिनोशिओला लाडू फोडून दिले. तिन्ही लाडू खाऊन ढेकर दिल्यावरही पिनोशिओ म्हणाला. "मला अजूनही भूक आहे, पण जेप्पेत्तो जवळ काहीच शिल्लक नव्हते.

पिनोशिओ जळलेल्या आपल्या पायाबद्दल सारखे दुःख करीत होता. रडत होता. नवीन पाय तयार करण्याबद्दल तो सारखा जेप्पेत्तोला विनंती करू लागला. परंन्तु जेप्पेत्तो त्याला शिक्षा व्हावी म्हणून तिकडे लक्षच देत नव्हता.

"कशाला तुला पाय हवेत ! पुनः पळून जायला?" जेप्पेत्तोने त्याला दरडावून विचारले.

"नाही पपा आता मी – पळून जाणार नाही. तुमच ऐकेन. शाळेत जाईन आणि एक चांगला हुषार मुलगा होईन." पिनोशिओ सुस्कारा सोडीत म्हणाला.



जेप्पेत्तोला हसू आले. त्याने पुन: लाकडाचे तुकडे घेऊन पाय तयार करायला घेतले. तासाभरात पाय तयार झाले. व तो पिनोशिओला म्हणाला, "जरा पडून रहा. डोळे मीट. पिनोशिओ गुपचूप झोपून गेला. जेप्पेत्तोने त्याला अगदी पूर्वीप्रमाणेच पाय चिकटविले. पाय मिळाल्याबरोबर पिनोशिओ ताडकन् उठून उभा राहिला. आनंदाने नाचू बागडू लागला. आणि म्हणाला, "आता मी शाळेत जाणार. पण पपा माझ्याजवळ चांगले कपडे नाहीत."

"खरे आहे रे बाळा. पण मी तरी काय करणार ?" असे म्हणून जेप्पेत्तो विचार करू लागला. त्याला एक युक्ती सुचली. त्याच्याजवळ एक फुलांचा कागद होता. त्याचा त्याने पिनोशिओला छानसा कोट तयार केला. लाकडाच्या राहिलेल्या भागापासून त्याने पिनोशिओसाठी चांगलेसे बूट तयार बनविले, आणि भाकरीच्या तुकड्याची एक ऐटबाज टोपी तयार केली. पिनोशिओने सगळे कपडे अंगावर चढवलें. तो आनंदाने उड्या मारू लागला.

"वा, वा, मी आता एखाद्या नबाबासारखा दिसतो. पण बाबा असा मोकळ्या हाताने मी शाळेत कसा जाणार ! मला एक पुस्तक हवे." पिनोशिओ रडकुंडीला येऊन बोलला. पण दरिद्री जेप्पेत्तो जवळ पुस्तक आणायलाहि पैसे नव्हते. मग तो तरी काय करणार ? पण पिनोशिओच्या चेहऱ्याकडे पाहून त्याला फारच दुःख झाले. त्यानें विचार केला आणि तो म्हणाला,

"थांब. मी तुझ्याकरता एक स्पेलिंगचे पुस्तक आणतो." जेप्पेत्तो बाहेर पडला.

थोड्याच वेळाने जेप्पेत्तो परत आला तेव्हां त्याच्या हातात एक सुन्दर पुस्तक होते. पण त्याच्या अंगात

कोट मात्र नव्हता. फक्त पँट आणि गंजीफ्रॉक एवढाच पोशाख त्याचे अंगावर होता.

"पप्पा, जाताना तर तुम्ही कोट घालून गेला होता. आणि येताना असे कसे आलात ? कोट कुठय तुमचा." पिनोशिओने प्रश्न केला.

"अरे फार उकडत होतं, आणि कोटही जुना झाला होता. म्हणून मी तो विकून टाकला आणि हे पुस्तक घेऊन आलो. नाही तर मला तो कोट नकोच होता." जेप्पेत्तो समजूतदारपणे व सहजतेने सांगू लागला.

पण पिनोशिओने ओळखले कीं आपल्या पुस्तका-करता पपांनी आपला कोट विकला आहे. त्याला पपां-बद्दल आता फारच आदर वाटू लागला. आणि त्याला दुःखहीं झाले. त्याचे नाक पुनः गळू लागले. अगदी प्रेमाने त्याने आपल्या वडिलांना मिठी मारली अन् त्यांचे चुंबन घेतले.

ऊन पडून थोडीशी थंडी कमी झाल्यावर पिनोशिओ शाळेत जाण्यास निघाला. चालत असताना त्याच्या मनांत पपांबद्दलचे विचार घोळत होते. आपल्यासाठी पपांना फार त्रास सहन करावा लागतो, याची त्याला जाणीव झाली. त्याने मनाशीच ठरविले कीं आज

आपण वाचायला शिकू, उद्या लिहायला शिकू आणि आणि परवा गणिताचा अभ्यास करू. मग आपणाला खूप पैसा मिळेल. मी माझ्या पपांसाठी एक उत्तम-प्रकारचा सुती कोट आणीन. पण छे! सुती नकोच सोन्याचांदीचा कोट करू. त्याला हिऱ्यांमाणकांची बटणे असतील. आज त्यांनी स्वतः थंडीत कुडकुडत राहून माझ्याकरता पुस्तक आणले आहे. मला त्यांची परत फेड कृतज्ञतेने केली पाहिजे. मी करीन.

अशाप्रकारचे विचार चालू असतानाच कुठून तरी ढोलाचा आणि पिपाणीचा आवाज येऊ लागला. पिनोशिओची विचारमालिका मध्येच तुटली. आणि आवाजाच्या दिशेने तो चालू लागला. त्याची उत्सुकता वाढली होती. कसला आवाज आहे हे पाहून तरी जावं म्हणून तो भराभर पावलं टाकू लागला.

एका मुख्य चौकात त्याला खूप गर्दी दिसली आणि एक तंबू उभारलेला दिसला. पिनोशिओ तेथे जाऊन पाहू लागला. वाद्यांचा आवाज आतून येत होता. पण कसला ते त्याला पहायचे होते. एका मुलाला त्याने हटकले आणि चौकशी केली.

"तू वाच की. तो बघ तिथे बोर्ड लिहिला आहे" तो मुलगा आढ्यतेने म्हणाला.

" ते खरं रे. मी वाचू शकतो. पण आज माझ्या डोळयांना काय झाले आहे काही समजत नाही. जरा त्रास होतोय रे ! तूच वाचून दाखव ना जरा. " पिनोशिओने आपले अज्ञान लपविले.

असं होय. बरं ! थांब हं मी वाचतो. हे पहा त्याच्यावर लिहिलं आहे - - -

' कठपुतळी नाटक कंपनी '

" खेळ सुरु झाला कां ! " पिनोशिओने विचारले.

" नाही अजून थोडा अवकाश आहे. " त्या मुलाने सांगितले.

" आत जायला तिकीट लागते काय. केवढयाचे " पिनोशिओ म्हणाला

" दोन आणे "

" दोन आणे ? " पिनोशिओला एवढा खर्च परवडण्यासारखा नव्हता. त्याच्या खिशांत एक पैसाही नव्हता. आतां काय करावे. तो अगदी उदास झाला. पण काय करणार ? खेळ पहाण्याची तर त्याला अनिवार इच्छा झाली. शाळेंत काय उद्या जातां येईल. पण आज हा खेळ तर पहायचाच. असा विचार करून तो पुनः त्या मुलाजवळ गेला. आणि विनंतीच्या सुरात म्हणाला,

"काय रे ! मला तू आज दोन आणे उसनें देशील कां ? "

" हो देईन की. पण तू मला केव्हां परत देणार ?

" उद्या नक्की देईन मी तुला. " पिनोशिओला आनंद झाला.

" पण मला त्याची खात्री नाही. मग मी कसे तुला पैसे देणार ? " मुलानें शंका काढली.

" मी पैसे दिले नाहींत तर तू माझा हा कोट विकत घे. मग तर झालं ना ! " पिनोशिओनें सांगितले.

" तुझा कोट ! ' मोठ्यानें हांसत तो मुलगा म्हणाला, " अरे तो तर कागदाचा आहे. तो घेऊन मला काय करायचे आहे. तो पाण्यानें भिजून जाईल. मला नको बुवा. "

आतां मात्र पिनोशिओ फारच निराश झाला. आतां काय करावे ? त्याच्यापुढें प्रश्न उभा राहिला. तंबूतून येणारे वाद्याचे स्वर तर त्याला परत जाऊं देईनात शेवटचा उपाय म्हणून त्यानें त्या मुलाला पुनः विचारले.

" काय रे तू माझें हें पुस्तक विकत घे. पण मला दोन आणे दे. "

" पुस्तक घेतले असते रे मी. पण हे बघ, माझ्या जवळ माझं तसलच स्पेलिंगचे पुस्तक आहे. मग कशाला

दुसरे घेऊ. आपल्याला कांही जमणार नाही बुवा. त्या मुलाने पिनोशिओला झटकून टाकले.

ह्या दोघांचा संवाद रस्त्याने जाणाऱ्या एका फेरीवाल्यानें ऐकला. तो लगेच पिनोशिओच्या जवळ आला. प्रेमानें त्याला जवळ घेऊन तो म्हणाला, "तुझे स्पेलिंगचे पुस्तक मी घेतो आण इकडे."

पिनोशिओला खूपच आनंद झाला. त्याने अगदी घाईने आपले पुस्तक फेरीवाल्याला देऊन टाकले. दोन आणे हातात पडल्यावर त्याचा चेहरा एकदम फुलून आला. मोठ्या समाधानाने त्याने तिकीट काढले आणि बाल्कनीत जाऊन बसला.

खेळ सुरू झाला. दोन कठपुतळे स्टेजवर होते. ते एकमेकांशी भांडत होते. एकमेकांना शिव्या देत होते. मारामाऱ्या करीत होते. पिनोशिओला त्यांची मोठी गंमत वाटली.

इतक्यांत अचानक एक घटना घडली. स्टेजवरील दोन कठपुतळ्यांपैकी हरले नांवाचा कठपुतळ्याची नजर वर बाल्कनीकडे गेली. त्याने पिनोशिओला पाहिलें मात्र. तो खेळ करण्याचे विसरला आणि एकटक पिनोशिओकडेच पाहू लागला. ते पाहून दुसऱ्या नेल्लो नांवाच्या कठपुतळ्यानेहि आपली दृष्टी तिकडे वळविली आणि दोघेहि एकदम आनंदाने ओरडले.

" हा तर आपला पिनोशिओ." पडद्यामागून आणखी एक कठपुतळा पुढे होऊन ओरडला.

" तो हो. अरे खरच कीं, पिनोशिओ तो आपला भाऊ."

" होय, होय आपला भाऊच.' सगळे जण आनंदाने उड्या मारत ओरडले.

" पिनोशिओ ये रे ये "

आता पिनोशिओला एक जाग्यावर बसणें शक्य नव्हते. कारण सर्व प्रेक्षक त्याच्याकडे वळून पहात होते. खेळ बंद पडला म्हणून ते चिडले होते. आमचे पैसे परत द्या. असे ते म्हणत होते, सर्वत्र एकच गडबड उडाली. शेवटी पिनोशिओने स्टेजवर उडी मारली.

पिनोशिओ स्टेजवर उतरल्याबरोबर सर्व कठ-पुतळ्यांनी त्याच्याभोवती गराडाच घातला. कुणी त्याला मिठ्या मारल्या. कुणी त्याचे हात प्रेमाने दाबले. आणि शेवटी कळसच झाला. आनंदाच्या भरात कांहींनी त्याला डोक्यावर घेतले. असा एकच जल्लोश उडून गेला. खेळ बंद पडला.

प्रेक्षक खेळ बघायला आलेले. त्यांनी खेळ सुरू करण्यास सांगितले. अखेरीस हे सारे असह्य होऊन



खेळ करणारा मालक जादुगार तेथे आला. त्याचा चेहरा उग्र दिसत होता. त्याची दाढी पायाच्या खाल-पर्यंत वाढलेली होती व जमिनीवर लोळत होती. अंगा-तील पैरणीवर जॉकेट होते. पँट गुडघ्याच्या थोडी ाली पण तंग होती. शरीराने तो धिप्पाड होता.

हातवारे करीतच तो स्टेजवर आला आणि एकदम दरडावून बोलू लागला. इंगळासारखे त्याचे लाल डोळे पाहून सर्व कठपुतळे घाबरून गेले, आणि चुपचाप झाले. पिनोशिओचा त्याला खूप राग आला होता. पिनोशिओ मुळे आज त्याचा खेळ बंद पडला होता.



संतापानें लाल होऊन त्याने पिनोशिओला दटाव-ण्यास सुरवात केली.

" कोण रे तू. गोंधळ करण्यासाठी तू इथे आलास होय. "

त्याचा आवाज ऐकून पिनोशिओ भयभीत झाला. काकुळतीने तो म्हणाला,

" नाही महाराज. मी तर खेळ पहायला आलो होतो. "

" गप्प बस. सरळ उत्तर दे. खेळ संपल्यावर बघताच तुझ्याकडे' चल तिकडे. " असे म्हणत जादुगाराने त्याला फरफटत ओढीत आत नेले.

बऱ्याच वेळाने खेळ संपला. आणि जादुगार स्वयंपाकघरात गेला. तेथे पुरी भाजी तयार होत होती, पण चुलीला जळण कमी पडले होते. चूल मंद होत होती. हे पाहून जादूगारानें हरेले व नेल्लो यांना हाक मारून जवळ बोलावले आणि खुंटीला दोरीने बांधून ठेवलेल्या पिनोशिओला घेऊन येण्यास सांगितले तो म्हणाला. " त्याचे पाय चांगल्या लाकडाचे आहेत ते चांगले जळतील. आणा त्याला इकडे. "

जादूगाराची रागीट आज्ञा ऐकून हरेले आणि नेल्लोला खूप वाईट वाटले. त्यांना पिनोशिओची दया आली. ते जरासे घुटमळले. पण जादुगाराच्या डोळ्यां-कडे नजर जाताच ते घाबरले. मुकाट्याने ते पिनो-शिओला बांधले होते, तिकडे गले. त्यांनी पिनोशिओला ओढतच आत आत आणले. बिचारा पिनोशिओ रडत

होता. मुसमुसून रडत होता. त्याची माशासारखी तडफड चालली होती. पण तो करणार काय ? त्याला पपांची आठवण झाली. तो ओरडू लागला. विनवणी करू लागला.

"पपा मला वाचवा हो. मी मरणार नाही."

जादूगार दिसायला अगदी भयानक होता. पण तो तसा दयाळूही होता. पिनोशिओला तडफडताना पाहून त्याला दया आली तो शिंकू लागला. जेव्हा जेव्हा जादूगाराला शिंका येत असत, तेव्हां त्याला कुणाची ना कुणाची तरी दया आली, असे नक्की समजावे. त्याचा हा स्वभावच होऊन गेला होता. त्याने आपली शिंक थांबविण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्याला इतकी मोठी शिंक आली. तो अडवूच शकला नाही. त्याच्या मोठ्या आवाजाने सर्व कठपुतळे घाबरून गेले. त्यांचे पाय लटपटू लागले. हृदय धडधडू लागले.

त्याच्या शिंकेचा योग्य तो अर्थ त्याच्या सहवासात रहाणाऱ्या इतर नेहमीच्या कठपुतळ्यांना माहीत झाला होता. त्यांचे सर्वांचे चेहरे एकदम पडले. त्यांना आपली भवितव्ये कळून चुकली. हरेले तर अगदी गळूनच गेला. तो अगदी हताश झाला आणि पिनोशिओकडे पाहून तो म्हणाला.

" पिनोशिओ तू आमच्यापेक्षा मोठा आहेस. तू यातून वाचणार. जादूगाराच्या या शिंकेचा अर्थ असा आहे की त्याला तुझी दया आली. आमचे कसे होणार ? "

पिनोशिओला ते ऐकून थोडा आनंद झाला. पण त्याची धडधड अजून चालूच होती. तो रडतच होता. त्याचे मुसमुसणे अद्यापि बंद होत नव्हते. जादूगाराला त्याची जास्तच चीड आली.

" थांबवतोस की नाही तुझे रडणे. बंद कर आवाज. तुला दिसतय ना ? तुला रडताना पाहून मला ऽ-- मला -- ऑ ऑं क् छी. ऑंक् छी --

बोल काय नांव तुझं ? तुझा आईवडील आहेत का ? कुठे आहेत ? " जादूगाराने एकामागून एक रागानेच प्रश्न विचारले.

" होय, मला वडील आहेत. पण आईबद्दल मला काहीच माहिती नाही. " पिनोशिओ रडतच उत्तरला.

" खरं बोल सगळं. आता हे पहा तुझे मी हात-पाय जाळले असते, तर तू काय केलं असतस. तुझ्या वडीलाना किती वाईट वाटलं असत. ऑं – ऽ क् – ऽ छी ---! आता पहा मला तुझी दया आली. पण आता चुलीला जळण मिळाले नाहीतर माझे जेवण शिजणार नाही. मी कच्चे कसे खाणार! मी उपाशी

रहाणार काय ? आता मला कुठल्यातरी कठपुतळ्याचा जळणासाठी उपयोग करावाच लागणार !"

विचार करून जादूगाराने एकदम हाक मारली. "ऐका रे शिपाइनो" त्याचे सर्व लाकडी शिपाई येऊन पुढे उभे राहिले. ते सर्व अशक्त व उंच होते. त्यांच्या हातात उघड्या तलवारी होत्या. त्या सर्वांना जादूगाराने एकदमच आज्ञा दिली.

"हे पहा या हरेलेचे हातपाय तोडा आणि त्याचे जळण वापरा."

हे ऐकून हरेले अगदी गळूनच गेला. शिपायांनी त्याला पकडले आणि ते त्याचे हातपाय ओढू लागले. हरेले ओरडू लागला. जीव वाचवण्यासाठीं दयेची याचना करूं लागला. पण जादुगाराने त्याकडे दुर्लक्ष केले. हरेले जमिनीवर आडवा पडला. पण शिपायांनी त्याला सोडले नाही. पिनोशिओचे नाक गळू लागले. तो रडतच म्हणाला, "सोडा हो, त्याला नको मारूं."

"मग मी काय उपाशी राहू. ते कांही नाहीं. मी त्याच्या हातापायांचा आज जळणासाठीं उपयोग करणारच." जादूगारानें अगदीं निश्चयानें सांगितले.

"टाका रे लवकर जळण चुलीत"



ही आज्ञा ऐकतांच हरेले थरथर कांपू लागला. शिपायांनी त्याला तसाच वर उचलला. पिनोशिओ आतां फारच काकुळतीला येऊन म्हणाला,

"दया करा हो महाराज त्याच्यावर. सरकार हुजूर असे करू नका." पिनोशिओ विनवणी करूं लागला

"आपल्याला महाराज, सरकार, हुजुरे असे आद–रानें म्हटल्यामुळें जादुगाराला जरा धन्यता वाटली. कारण ह्या सगळ्या मोठ्या माणसांच्या पदव्या आहेत.

जादूगार या स्तुतीने अगदी आनंदून गेला. त्याच्या अंत:करणांत गुदगुल्या होऊ लागल्या. त्याला शिंक येऊ लागली. पण ती आवरून तो म्हणाला " काय हवय रे तुला."

" या गरीब हरेलेला सोडून द्या रावसाहेब." पिनोशिओ.

" आणि मी काय उपाशी राहू कीं कच्ची भाजी खाऊं. ते कांही चालायचे नाही. मी ऐकणार नाहीं."

" असं काय ? मग मला माझे कर्तव्य करूं द्या. मी माझ्या पपांचे ऐकले नाही. उलट त्यांनी थंडी सहन करून माझ्या पुस्तकासाठी कोट विकला. मी मात्र पुस्तक विकून खेळ बघायला आलो. मी भयंकर चूक केली आहे. मला त्याबद्दल शिक्षा द्या. हरेलेला क्षमा करा मला जाळा. मला जाळा. आणि तुमची भाजी शिजवा." पिनोशिओ जादूगारासमोर नम्रतेनें विनवणी करू लागला.

" आँ क् छी " पुनः जादुगाराला शिंक आलीं. पिनोशिओच्या बोलण्याने त्याच्या मनांत दया उत्पन्न होऊ लागली होतीं. दुसऱ्यासाठी आपला प्राण देण्यास तयार झालेला पिनोशिओ म्हणजे त्याला एक आदर्श कठपुतळा

वाटू लागला. इतर कठपुतळ्यांनाहि पिनोशिओच्या भाषणाचे टाळ्या वाजवून स्वागत केले. ते नाचू लागले. जादुगाराला ओळीनें चार पांच शिका आल्या. त्याने पिनोशिओची पाठ थोपटली. सर्वांनाच आनंद झाला.

" थांबा. मी हुकूम देतो." जादुगार कडाडला. आता पुनः सर्वत्र शांतता पसरली. कारण हा खरोखरच पिनोशिओला जाळतो काय ?

" शिपायांनो. " नंतर तो प्रेमळ आवाजात म्हणाला–हरेलेला सोडून द्या. आज माझी भाजी कच्ची राहिली तरी चालेल. पण लक्षांत ठेवा. पुनः मात्र असं होता कामा नये.

सर्व कठपुतळ्यांना जेव्हां ही हकीकत समजली तेव्हां सर्वजण आनंदानें उड्या मारू लागले. नाचू लागले. उरलेली रात्र सर्व कठपुतळ्यांनी पिनोशिओच्या सहवासात गंमत करण्यात घालविली. ते रात्रभर मजेने खेळत होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी जादूगाराने पिनोशिओला जवळ बोलावून घेतले आणि विचारले.

" तुझ्या वडिलांचे नांव काय ? ते काय उद्योग करतात."

"नांव जेप्पेत्तो. पण ते फक्त भीक मागून जगतात.

"अस्स. पण भीक मागून किती मिळवतात ? जादुगाराने पुन्हां प्रश्न केला.

"कसले मिळवतात ! एक पैसाहि शिल्लक रहात नाही. पैसाच पुरत नाही. आता हेच पहा ना. मला मला पुस्तक हवे म्हणून त्यांनी आपला कोट विकला. आता त्यांना थंडीतच कुडकुडत रहावे लागेल." पिनोशिओ गद्‌गदल्या स्वरांत उत्तरला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय शाखा.
अ. क्र. ४५९६२ वि. ......
क्रमांक ...३३६२... नोंद दि. २५।१२।६८

# ४. डाकूंचा हल्ला


" अरेरे, बिचारा. धर या पांच मोहरा. त्यांना नेऊन दे. आणि पुढे त्यांचे नीट ऐकत जा. मोठ्या माणसांच ऐकल म्हणजे संकट येत नाहीत. जा आता." जादुगाराने अत्यंत प्रेमाने त्याला निरोप देऊन त्याच्या हातावर पांच मोहरा ठेवल्या. पिनोशिओने त्याला वाकून नमस्कार केला. आणि तो इतर सर्व कठ-पुतळ्यांना भेटून त्याचा निरोप घेऊन तेथून बाहेर पडला.

तो घराकडे परत जाण्याकरता निघाला. त्याला खूप समाधान वाटत होतं. तो आपल्या पपांसाठी या पैशातून काही तरी खरेदी करणार होता. कधी एकदा पपांना भेटतो असे त्याला झाले होते. तो झपाझप पावले टाकू लागला. परन्तु तो फार चालून गेला असेल नसेल तोच त्याला रस्त्यातच एक लंगडा कोल्हा आणि आंधळं मांजर दिसले. ते दोघे एकमेकांना मदत करीत
ो पो शओ रस्त्याने मोहरा खुळखुळवित आणि

खेळ करीत चाललेला कोल्हयाने पाहिले आणि त्यांनी पिनोशिओला फसवायचे ठरविले.

" नमस्कार पिनोशिओ. " कोल्हयाने पिनोशिओला हटकले.

" अरेच्या, माझे नांव तुम्हाला कसे ठाऊक ? "



" हं, अरे आम्ही तुझ्या पपांना ओळखतो. ते काल दारात थंडीने कुडकुडत बसले होते. त्यांनीच आम्हाला सांगितले की पिनोशिओला शोधून आणा. कुठे तरी चुकला आहे तो. रस्ता सापडला नसेल. म्हणून आम्ही तुला शोधायला निघालो होतो. बरं झालं भेट झाली. बिचारे तुझे पपा !

कोल्हा आणि मांजर यांनीं पिनोशिओला भुरळ पाडण्यास सुरवात केली.

" माझे पपा गरीब आहेत. पण ते आता असे गरीब रहाणार नाहीत. त्यांना मी आता खूप श्रीमंत बनवणार आहे. त्यांना यापुढे थंडीन कुडकुडू देणार नाही. " पपांची आठवण येऊन पिनोशिओला वाईट वाटले. तो भाबडया मनाने बोलू लागला. त्याचे बोलणे ऐकून कोल्हयाला व मांजराला नवल वाटले.

' वा, असं का ? पण तू हे सगळं कसं करणार बुवा ! तुझ्याजवळ तर पैसेहि नाहीत. " कोल्हयाने विचारले.

" अरे जा. आता आम्ही श्रीमंत झालो आहोत." पिनोशिओ जोरात उत्तरला. कारण त्याच्याजवळ पांच मोहरा खुळखुळत होत्या ना. त्यांच्या जिवावर तो बोलत होता.

कोल्हा कुच्छितपणे हसला. मांजरही गालातल्या गालात हसू लागले. आपले हसू दडविण्यासाठी त्याने मिशीवरून पाय फिरबिण्यास सुरवात केली. पण पिनो–शिओने त्याचे हसणे ओळखले होते. पिनोशिओ रागाने म्हणाला. " यात काय हसण्यासारखे आहे. हे बघा. माझ्याजवळ पांच सोन्याच्या मोहरा आहेत. ह्या पहा. "

इतके बोलून त्याने कोल्हा आणि मांजर यांना त्या सोन्याच्या मोहरा दाखविल्या. मोहरांचा आवाज ऐकून कोल्ह्याने आपला एक पाय पुढे टाकला. याच पायाने तो लंगडा होता. मांजरानेही आपले डोळे उघडून पाहिले आणि पुन: मिटून घेतले. ही लबाडी पिनोशिओच्या लक्षात येण्यास वेळ लागला नाही.

ती दोघे पिनोशिओला म्हणाली,

" मित्रा पिनोशिओ, या एवढ्याशा धनाचं तू काय करणार ? "

" प्रथम मी पपांना कोट घेईन. तो सोन्याचांदीचा बनवून त्याला हिऱ्यामाणकाची बटणे लावीन. नंतर मी एक पुस्तक घेईन. कारण आता मी लिहायला वाचायला शिकणार आहे. ' पिनोशिओ उत्तरला.

" अरेरे, तू काय करणार शिकून ? पाहिलं नाहीस का मी शिकतानाच चक्कर येऊन पडलो आणि माझा पाय मोडला. " कोल्ह्याने अभ्यासाबद्दलची आपली तक्रार सांगितली.

" होय ना ? माझेही असेच झाले. अभ्यास करून आणि पुस्तके वाचून मलाही हे आंधळेपण प्राप्त झाले आणि माझी अशी ही दशा झाली. " मांजराने

आपलाही मोठा अनुभव सांगितला. अभ्यासाने नुकसान होते यावर कोल्हा आणि मांजर यांचे एकमत झाले होते.

पिनोशिओ विचार करू लागला. इतक्यात झाडावर बसलेली एक चिमणी काही तरी बोलू लागली. पिनोशिओला इशारा देऊ लागली.



" पिनोशिओ सावधान. पिनोशिओ तू परत घरी जा. त्यांचं बोलणं तू ऐकू नकोस. अजून वेळ निघून गेली नाही. तू ताबडतोब घराकडे परतलेले बरे. " चिमणीने त्याला सावध केले. त्यालाही ते पटल्यासारखे वाटले.

त्याने विचार केला. मला घरी तर गेलेच पाहिजे पण प्रथम ह्या सुवर्णमोहरा कुठे तरी लपविल्या पाहिजेत.

त्याचे हे विचार चक्र चालू असतानाच कोल्हा म्हणाला, " पिनोशिओ, माझ्या मित्रा तू कुणाचेही कांहीही ऐकू नकोस. त्या चिमणीला वाटते तू आपले सोने तिला देऊन टाकावेस. पण तसे करू नकोस. "

मांजरानेही संभावितपणे उपदेश केला. ते म्हणाले

" आम्ही तुला हे सोने वाया घालवू देणार नाही. तूं तुझ्या गरीब पपांचा विचार कर . "

पिनोशिओला मांजराचे म्हणणे पटले. कारण पपांबद्दल त्याला आदर होता. मांजराने पपांचा अुल्लेख केल्यामुळे ते मांजर त्याला जवळचे वाटू लागले. तो विचार करू लागला. इतक्यात झाडावरील चिमणी पुनः पिनोशिओला सावध करण्यासाठी काही तरी सांगणार होती. पण मांजराचे तिकडे लक्ष गेले. हळूच चोर पावलानी ते झाडावर चढले. आणि त्याने चिमणीवर झडप घालून पंखासहित चिमणीला खाऊन टाकले. पुनः खाली उतरले आणि आंधळे झाले. पिनोशिओला त्या चिमणीबद्दल वाईट वाटले आणि मांजराच्या रानटीपणाचा रागही आला. त्याने विचारले, " तू चिमणीला का खाऊन टाकलेस तू असे करायला नको होतेस. मला हे आवडले नाही. "

" पिनोशिओ, कुणीही कुणाच्या मध्ये पडू नये. ह्या धडा चिमणीला देण्यासाठी मी असे वर्तन केले. दुसऱ्याच्या मार्गात आडवं आलं की अशाच प्राण संकटाला तोंड द्यावे लागते. हा धडा तू ही लक्षांत ठेव." मांजर धर्मगुरूच्या रुबाबात उपदेश करू लागले.

कोल्हा हे सर्व नीट लक्ष देऊन पहात होता. त्याने पिनोशिओला विचारले, " सांग मित्रा, तू ह्या सुवर्ण मोहरा विकतोस काय ? पहा, शंभर रुपयाला देतोस की हजार रुपयाला का लाख रुपयाला देतोस."

" हो हो, जरूर देईन." पिनोशिओ आनंदाने म्हणाला " मग ठीक आहे तर ! पण घरी जाण्यापूर्वी तुला आमच्याबरोबर आधी यावे लागेल." कोल्ह्याने आपला डाव टाकला.

" कुठे ? कुठे घेऊन जाणार तू मला." पिनो-शिओ उल्लुझोंच्या राज्यांत " कोल्हा म्हणाला.

पिनोशिओने विचार केला. थोड्या वेळानें तो एकदम म्हणाला, " नाही बुवा. मीं कांही येत नाही. पपा कालपासून माझी वाट पहात असतील. त्यांचे कालपासून काय हाल झाले असतील कोण जाणे. मला घरी गेलेच पाहिजे."

परंतु कोल्हा कसला वस्ताद. तो आपले माया-जाल पसरू लागला. तो बेपर्वाइनें म्हणाला, " हे बघ. तुला जायचे असेल तर जा. आमचा कांही आग्रह नाही. पण पायाशी आलेल्या संपत्तीला तू लाथाडतो आहेस. ही संधी पुनः पुनः येणार नाहीं. संपत्तीला कधीही लाथ मारूं नकोस."

मांजरानेही कोल्होबाच्या या म्हणण्याला दुजोरा दिला. ते म्हणाले, " पिनोशिओ, तुझ्या पांच मोहरां-पासून दोन हजार मोहरा तयार होतील. याचा तू विचार कर."

" ते कसे काय? पिनोशिओने कुतूहलाने विचारले.

" अरे तुला माहित नाही कां? उल्लझोच्या देशात एक मैदान आहे. त्याला जादूचे मैदान म्हणतात. त्या मैदानांत कुठेही एक खड्डा खणून एक मोहोर पुरून ठेवायची. खड्डा बुजवून त्यावर दोन चिमटी मीठ शिपडून रात्री झोपायचे सकाळी जागे झाल्यावर तुला दिसेल, तेथे मोहोरांचे झाड उगवले आहे. त्याला मोहराच मोहरा लागलेल्या आहेत. मग फक्त हव्या तेवढ्या मोहरा तोडायच्या."

हे अदभूत ऐकून पिनोशिओच्या तोंडाला पाणी सुटले. कारण ही अशी गोष्ट त्याने कधी ऐकलीच

नव्हती. त्याला मोह उत्पन्न झाला. तो त्या कोल्ह्याला म्हणाला, " जर मी याच मोहरा रोवल्या तर काय होईल ? "

" मग तर इतक्या मोहरा लागतील की काही विचारू नकोस. दहा हजाराच्या वर लागतील. तू एकदम श्रीमंत होशील." कोल्ह्याने सरळ हिशोब सांगितला.

" बस तर मग. मी तुम्हाला पांचशे मोहरा बक्षीस देईन. चालेल ?" पिनोशिओने सौदा करण्यासाठी विचारले. " बक्षीस ? " कोल्हा उद्गारला.

" कसले बक्षीस. अरे आम्ही सर्वांचे चांगले चिंतीत असतो. आम्हाला काय करायचे आहे बक्षीस " मांजर अगदी साधूवृत्तीने बोलले.

पिनोशिओला त्यांच्याविषयी जास्त आदर वाटला. किती भले आहेत हे. तो त्यांच्याबरोबर जायला अगदी आनंदाने तयार झाला. असे मोठ्या विचाराचे मित्र त्याला शोधूनही मिळाले नसते. ते फक्त दुसऱ्यांचे चांगले होण्याची इच्छा करतात. दहा हजार मोहरा मिळाल्यावर काय काय करता येईल, याची तो मनांतल्या मनांत यादीच करीत होता.

सारे जण गप्पागोष्टी करीत खेळीमेळीने जादूच्या मैदानाची वाट चालू लागले. मैदान फार दूर होते

जाता जाता रस्त्यातच रात्र पडली. जवळपास कोठे आसरा आहे का, याचा त्यांनी शोध घेतला. वास्तविक मांजर व कोल्हा यांना या रस्त्याची चांगलीच माहिती होती. पण त्यानी उगाचच शोधाशोध करून एक खानावळ शोधून काढली. तेथेच मुक्काम करायचे ठरवून अर्धी रात्र संपल्यावर तेथून पुढचा प्रवास करायचा असा त्यांनी निर्णय घेतला. ते तिघंजण जेवायला बसले. कोल्ह्याने आपल्याला बरे नाही म्हणून सांगितले. मांजराचे पोट दुखत होते. परन्तु प्रत्यक्षांत मात्र दोघेही भरपूर जेवली आणि पिनोशिओ मात्र उपाशीच राहिला. जेवण झाल्यावर मांजर व कोल्हा आपल्या खोलीत गेले आणि पिनोशिओ आपल्या खोलीत गेला. सर्वांनी एक विचाराने ठरविले होते की अर्धी रात्र सरल्यावर इथून निघायचे. म्हणजे उजाडेपर्यंत ते मैदानावर पोहोचले असते.

पिनोशिओला झोपेत रंगीबेरंगी स्वप्ने पडत होती. पैशाची झाडेच झाडे त्याला दिसत होती. श्रीमंत होऊन रुबाबदारपणे रहात असल्याचे तो पहात होता. झाडासारख्या मोहरा तोडून तो खिशांत भरत होता.

इतक्यात दारावर खट्‌खट्‌ल्याचा आवाज त्याला ऐकू आला. त्याची झोपमोड तर झालीच पण गोड

स्वप्नांचा भंग झाला. डोळे चोळतच तो उठला. आणि त्याने दार उघडले. दारात खानावळीचा मालक उभा होता. "जायचं आहे ना तुम्हाला ? तुमचे मित्र केव्हांच निघून गेले. मांजराचा मोठा मुलगा आजारी आहे अशी त्याला तार आली. म्हणून ते गेले. त्यांनी रात्रीच्या जेवणाचे पैसेही दिले नाहीत. तुमचे पाहुणे आहेत ते. म्हणून आम्हीही मागितले नाहीत." खाना-वळीच्या मालकाने सविस्तर माहिती सांगितली.

पिनोशिओला वाईट वाटले. पण काहीही न बोलता त्याने एक मोहोर खानावळीच्या मालकाच्या हातावर ठेवली आणि तो बाहेर पडला. अंधारी रात्र होती. काळोख दाटला होता. पिनोशिओ एकटाच पुढे निघाला. दाट झाडीतून मार्ग काढीत तो चालू लागला.

एका झाडावर एक किडा चमचम करत होता. तो किडा बोलू लागला.

"पिनोशिओ अजूनही मागे फिर. यांत तुझा फायदा होणार नाही."

"कोण रे तू ? पिनोशिओने विचारले.

"मी ? तू हातोड्याने मारलेस त्या फुलपांखराचे मी भूत आहे. तुझ्या भल्याकरतां मी तुला सांगत आहे. तू परत जा. इकडे येऊ नकोस." तो चमकणारा किडा म्हणाला.

" पण मी त्या जादूच्या मैदानाकडे चाललो आहे. तेथून मी खूप मोहरा आणीन." पिनोशिओ उत्तरला.

" हा मोह तू सोडून दे. त्यांत तुझें हीत नाही. ते दोघेजण डाकू आहेत. ते तुला मारतील."

इतके सांगून तो चमकणारा किडा अदृश्य झाला.

पिनोशिओ एकटाच पुढे निघाला. त्याच्या डोळ्यापुढे फक्त मोहरांची झाडेच उभी रहात होती. तो कसलाही विचार करायला तयारच नव्हता.

इतक्यांत झाडीतून पाने वाजल्याचा आवाज ऐकू आला. झाडीतून दोन बुरखेवाले बाहेर आले. ते ओळखू येत नव्हते. त्याला पळणेही अशक्य झाले. कारण झटकन् एकाने त्याचा हात पकडला व त्याला म्हणाला,

" पैसे तरी दे. नाहीतर जीव तरी दे "

पण पिनोशिओने आपल्या जवळील मोहरा तोंडांत ठेवल्या होत्या. त्यामुळे त्या सुरक्षित रहातील याची त्याला खात्री होती. पण तोंडातल्या मोहरांमुळें त्याला बोलताही येईना. त्याने मानेनेंच नाही म्हणून सांगितले. सुटण्याची तो धडपड करूं लागला. पण दोघांनीही त्याला घट्ट पकडले होते. ते त्याला सोडण्यास तयार नव्हते.

" जे तुझ्याजवळ असेल ते दे नाहीतर आम्ही तुला मारूं " दोघेजण अधिकारवाणीने म्हणाले.

तरीही पिनोशिओनें मानेनेच नकार दिला. हे पाहून एकाने त्याचा हात हिसकला, व ते म्हणाले, " हे पहा, मुकाटयाने दे नाहीतर आम्ही तुला आणि तुझ्या पपांनाही मारूं. "

" नको नको माझ्या पपांना मारू नका." पिनोशिओ भीतीने ओरडला. इतक्यात त्याच्या तोंडातल्या मोहरा वाजल्या.

" अस काय ? आम्हाला धोका देतोस. काढ त्या मोहरा मुकाटयाने दे इकडे "

पण पिनोशिओ काहीच न बोलता गप्प उभा राहिला त्यामुळें ते अधिकच चिडले. त्याच्यावर दोन्ही बाजूनी तुटून पडले. मांजराने त्याचे तोंड उघडण्याचा प्रयत्न केला.

पिनोशिओन तोंड घट्ट दाबून धरले होते. त्यांच्याने पिनोशिओचे तोंड उघडले जाईना. तेव्हां त्यांनी जंगलातून एक काठी घेतली व काठीने त्यांचे तोंड उघडण्याचे प्रयत्न केला. पण काठी मोडली. पिनोशिओने आपल्या दातांच्या साहाय्याने एका गुंडाचा हात तोडला आणि थुंकून टाकला. तो काय आश्चर्य ! तो हात मांजराचा



होता. तो गुंड मांजराच्या आवाजांत रडू लागला. संधी साधून पिनोशिओने पळ काढला. व झाडावर चढून बसला. ते दोघेही गुंड झाडावर चढले. पण पिनोशिओने त्यांना ढकलून दिले. दोघेही खाली पडले. पण त्यांनी पिनोशिओचा पिच्छा सोडला नाही. जंगलांतल्या काटक्या जमवून त्यांनी झाडाखाली जाळ केला. पिनोशिओने अलगद दुसऱ्या झाडावर झेप घेतली. ते दोघेही गुंड त्याच्या पाठीमागे होतेच.

सकाळ झाली तरीहि ते दोघे गुंड पिनोशिओचा पाठलाग करीतच होते. पिनोशिओ पुढे पळत होता. पळता पळता तो एका खोल दरीपाशी आला. दरी

बरीच खोल, रुंद व लांबलचक होती. त्याने सर्वशक्ति पणाला लावून उडी मारली. व सुदैवाने तो पलीकडे पोचला. मागे लागलेल्या गुंडांनीहि उड्या मारल्या. पण ते दरीतील घाणेरड्या पाण्यांत पडले. पिनोशिओने वळून पाहिले, त्याला हसू आले पण क्षणभरच. कारण ते दोघेही गुंड पोहत पोंहत दुसऱ्या तीराला येऊन पोचले. आणि पुनः पाठलाग सुरू झाला. पिनोशिओ जीव वाचविण्याचा प्रयत्न करीत होता. त्याला आधार हवा होता. त्याला दूरवर एक घर दिसू लागले. त्याला उत्साह आला. तो अधिक जोराने पळू लागला. बऱ्याच वेळाने तो त्या घराजवळ येऊन पोहोचला. त्याने दार ठोठावले.

आतून एक सुन्दर मुलगी खिडकीत आली. ती सांगू लागली.

"इथे कुणीही नाहीं. सर्वजण मेले आहेत."

"तू दार तर उघड. माझ्यावर दया कर. मी अत्यंत अडचणीत आहे." पिनोशिओ ओरडलाच.

"पण मी सुद्धा मेले आहे." आतून तरुण स्त्रीने उत्तर दिले.

"तूही मेलीस मग घरात काय करीत आहेस?" पिनोशिओ.

" मी आता कबरस्तानात जाण्यासाठी वाट पहात आहे" असे म्हणून त्या सुन्दरीने खिडकीचे दार बंद करून घेतले.

पिनोशिओ पुनः जोरात दार ठोठावू लागला. इतक्यात कुणीतरी मागून त्याची मानगूट धरली. दोन्ही बाजूला ते दोघे डाकू उभे होते. पुनः तो डाकूंच्या कचाट्यात सापडला. थरथर कापू लागला तो. त्याने तोंड बंद करून घेतले. त्या दोघाही डाकूंनी आपल्या खिशातून चाकू बाहेर काढले आणि पिनोशिओवर वार करू



लागले. पण आपला बहाद्दर पिनोशिओ लाकडाचा होता. त्यामुळे दोघांही गुंडाचे चाकूच मोडून गेले. त्या गुंडाचांही नाईलाज झाला. असे दोनदा झाले. शेवटी त्यांनीं पिनोशिओला फाशी देण्याचा विचार केला.

त्यांनी पिनोशिओचे हात पाठीमागे बांधले आणि त्याच्या गळयांत एक दोरी बांधून त्याला झाडावर टांगून ठेवले. त्याच्या मरणाची वाट पहात हे दोघेही बसून राहिले. खूप वेळ वाट पाहिली पण पिनोशिओ मेला नाही अखेर ते कंटाळून गेले. उद्या सकाळपर्यंत तरी हा नक्की मरेल. तेव्हां उद्या सकाळी परत यावे, असा विचार करून दोघेहि परत फिरले.

पिनोशिओला आता खूपच त्रास होत होता. पण वाराही जोराचा सुटला होता. त्यामुळे फांदी हले व त्याला वेदना होत. थंडीपण वाजे. त्याचे शरीर हळू हळू थंड पडू लागले. डोळे मिटू लागले. पण तरीही त्याला आशा वाटत होती, अजून कुणी तरी आपल्याला सोडवील. अखेर त्याची शरीरातील हालचालही बंद होऊ लागली. आणि आता रात्रही झाली होती.

# ५. परीताई

त्या घरातील सुंदर तरुणीने सकाळीं सहज आपल्या घराची खिडकी उघडली, समोर झाडाकडे तिची नजर गेली मात्र. तिला धक्काच बसला जो आपल्याकडे आधार मागायला आला होता, त्यालाच कुणी तरी फाशी दिले होते. ते दृष्य पाहून तिला खूप वेदना झाल्या. तिने लगेच तीन वेळा टाळी वाजवली.

पाहता पाहता तेथे एक गरुड येऊन बसला. त्याने लवून नमस्कार केला. आणि हुकमाची वाट पाहू लागला.

“ गरूडा जा लवकर. त्या समोरच्या झाडावर त्या कठपुतळयाला टांगून ठेवले आहे, तू आपल्या चोचीने तो दोर कापून काढ, आणि त्या पुतळयाला अलगद खाली ठेव. ” तिने हुकूम सोडला.

ती तरुणी म्हणजे त्या जंगलातील एक परी होती. तेथील सर्व पशु पक्षी तिच्या आज्ञेत रहात असत. तिची



आज्ञा घेऊन गरूड उडून गेला. त्याने आपल्या चोचीने दोर तोडला, आणि अलगद पिनोशिओला गवतावर उतरविले. तो पुनः परीकडे आला व म्हणाला, "तो कठपुतळा मेल्यासारखा वाटत होता. पण तो अजून जिवंत आहे. त्याच्या मानेची दोरी सैल केल्याबरोबर तो पुटपुटला, "अहाहा, आता मला जरा बरं वाटतय."

परी कांहीच बोलली नाही. तिने पुनः तीनदां टाळी वाजविली. एक पांढरे कुत्रे तिच्या पुढें येऊन उभें राहिले.

" जा ताबडतोब गाडी घेऊन आणि त्या मोठ्या झाडाखाली गवतावर झोपलेल्या मुलाला घेऊन ये. " परीने आज्ञा सोडली.

कुत्र्याने गाडी काढली. त्यांत सुंदर गाद्या अंथरल्या. शुभ्र पांढरे असे शंभर उंदीर गाडीला जुंपले कुत्रा स्वत: गाडी हाकू लागला. गाडी पिनोशिओजवळ आली. उचलून पिनोशिओला गाडींत ठेवण्यांत आले. व परत परीच्या दारांत गाडी येऊन उभी राहिली. पिनोशिओला एका चांगल्या खोलींत नेले. थोड्याच वेळांत तेथें जंगलातील प्रसिद्ध डॉक्टरही बोलावण्यांत आले. त्यात एक कावळा, दुसरा घुबड आणि तिसरे फुलपांखरू होते.

डॉक्टर आल्यावर परीने प्रथम विचारले, "हा कठपुतळा जिवंत आहे कीं मेला आहे ? "

प्रत्येक डॉक्टरांनीं त्याचे शरीर तपासले.

कावळा डॉक्टर म्हणाला, " तसं पाहिलं तर हा मेला आहे. पण हा जिवंत असण्याचीही शक्यता आहे. "

पण लगेच घुबड डॉक्टरने त्याच्या या विधानावर हल्ला चढविला. तो म्हणाला मला वाईट वाटतं. पण माझं मत मात्र या कावळा–डॉक्टर मित्राच्या विरुद्ध आहे. मला वाटतं हा जिवंत आहे. पण कदाचित हा आतां मेला असणेही शक्य आहे. "

हे ऐकून फुलपांखरू डॉक्टरांनीं आपला चेहरा चाईट केला. तो म्हणाला, "माझ्या डॉक्टर मित्रांनी उलट सुलट मते व्यक्त करण्याचे काहींच कारण नाहीं.

आपल्याला समजत नाहीं तर आपण गप्प बसावं. या दोघांच्याहि बोलण्यांत काहीं अर्थ नाहीं. हा जो कठपुतळा इथे निजला आहे तो जिवंतही नाहीं व मेलेला नाहीं. हा कठपुतळा आहे आणि याला प्रथम मी पाहिले नाहीं.

त्या फुलपांखराचा आवाज ऐकून पिनोशिओ एकदम उठून बसला आणि पुनः गादीवर पडला.

"हा कठपुतळा म्हणजे अट्टल बदमाश आहे. अगदी बेताल मुलगा आहे." फुलपांखराने सांगितले.

पिनोशिओने बिछान्यात आपले तोंड लपविण्याचा प्रयत्न केला.

"हा इतका बदमाश आहे की त्याच्या वडिलांचे तो ऐकत नाही. त्याचे वडील त्याच्या आठवणीन दुःखी झाले आहेत. व मरणाच्या पंथाला लागले आहेत. आणि हा मात्र इकडे तिकडे भटकतो आहे." फुल-पांखराने सर्व काहीं सांगून टाकले.

हे सर्व ऐकून पिनोशिओला फार दुःख झाले. तो मुसमुसून रडू लागला. सगळयांचे एकदमच तिकडे

लक्ष गेले. व कावळा डॉक्टर म्हणाला, "जर मरत असलेली व्यक्ती रडू लागली तर समजावे की त्याची तब्येत सुधारत आहे."

"चूक आहे हे." घुबड डॉक्टर एकदम खेकसला. "मरणारा जर रडू लागला तर समजावे की त्याला फार दुःख झाले आहे आणि त्याचा आजार वाढत आहे."

झाले दोघेही डॉक्टर हमरीतुमरीवर आले. त्याना शांत करता करता सर्वांना पुरेवाट झाली.

जंगलच्या परीने तिन्हीही डॉक्टरांचे आदरातिथ्य करून त्यांची रवानगी केली. ती पिनोशिओच्या बिछान्याजवळ आली. आणि त्याच्या डोक्यावर हात ठेवला. त्याच्या अंगात ताप होता. डॉक्टर तर औषध न देताच परतले होते. अखेर परीने एका ग्लासात औषध आणले आणि पिनोशिओला औषध घेण्याचा आग्रह करू लागली. औषधाने लवकर गुण येईल असेहि तिने सांगितलें पण ते कडू औषध घेण्यास पिनोशिओ तयार नव्हता. परीने त्याची खूप समजूत काढली. पण तो ऐकेना. तिने त्याला औषधावर खडीसाखर देण्याचा कबूल केले. पण पिनोशिओ हट्ट धरून बसला. "खडीसाखर अगोदर मिळाली तरच औषध पिईन."

परीने त्याला खडी साखरेचा खडा दिला पण पिनोशिओने लगेच खाऊन टाकला व म्हणाला, " फारच गोड आहे. आणखी दे ना ! "

" वा वा. औषध घेतल्याशिवाय खायचे नाही अस सांगूनही तू ऐकलं नाहीस." परी म्हणाली.

पण तो औषध घेण्याचे टाळू लागला. परीने दुसरा खडा आणून ठेवला. पण तरीही तो काही तरी सबबी सांगू लागला. पाया जवळच्या तक्यामुळे त्रास होत आहे अशी तक्रार त्याने केली. परीने तक्क्या दूर केला. पण पिनोशिओने औषध घेतलेच नाही. परीने त्याला खूप समजावले पण काही उपयोग झाला नाही.

इतक्यात तेथे चार भली मोठी कबूतरे आली. पिनोशिओ घाबरून गेला. " कोण तुम्ही. मला कुठ नेणार ? मीं काहीं मेलो नाही." पिनोशिओ रडत रडत म्हणाला.

" तू मेला नाहीस. पण औषध घेतले नाहीस तर मात्र मरशील." कबूतरे सांगू लागली.

पिनोशिओला जास्तच भिती वाटली. त्याने पटकन औषध घेतले. त्याला थोड्याच वेळात बरे वाटू लागले. तो उठून इकडे तिकडे पाहू लागला. परीलाही

आनंद झाला. तिने विचारले, " अरे, जंगलात तू कसा आलास ? ते डाकू तुझ्यामागे का लागले होते."

पिनोशिओने जादूगाराकडून मिळालेल्या मोहरां-पासूनचा सारा इतिहास परीला सांगितला.

हे सगळं ऐकून परीने विचारलें, " मग त्या चार मोहरा तुझ्याजवळ आहेत ?"

" आता त्या कुठे पडून गेल्या ते मलाहि माहीत नाही " पिनोशिओने खोटव सांगितले. खोटे बोलल्या-बरोबर पिनोशिओचे नाक लांब झाले.

परीने पुन: विचारले· कुठे 'फेकल्यास त्या मोहरा·"

" कुठें तरी जंगलात." पुन: तो खोटे बोलला. त्याचे नाक आणखी लांब झाले.

" जर तू जंगलात फेकल्या असशील तर त्या तुला परत मिळतील. मी माझ्या नोकरांना पाठवते. " परी म्हणाली


" हो हो, आता मला आठवलं. मी त्या मोहरा तोंडात ठेवल्या होत्या. परंतु आताच तुम्ही जे औषध पिण्यासाठी दिलत त्याबरोबर त्या मोहरा माझ्या पोटात गेल्या. " पुनः पिनोशिओ खोटे बोलला. त्याचे नाक आणखीनच लांब झाले, इतके की त्याला आता आपली मानही वळविणे अवघड झाले.

" पाहिलस तू खोटं बोललास. म्हणून तुझे नाक इतके लांब झाले." परी हसू लागली. लांब नाकाची तिला गंमत वाटली. पिनोशिओ मात्र लाजेने चूर होऊन गेला. तो आपले तोंड लपवू लागला. पण त्याच्या लांब नाकामुळे त्याला कसलीही हालचाल करणे अवघड जाऊ लागले. तो खोलीतून बाहेरही पडू शकला नाही.

शेवटी तो रडू लागला. त्याला पटले होते की खोट बोलण चांगलं नाही. खोटे बोलल्याने माणसे आपल्याला हसतात. त्याने निश्चय केला की आता खोटे बोलायचे नाही.

त्याचे रडणे ऐकून परीला दया आली. पिनोशिओने परीजवळ सगळे खरे खरे सांगून टाकले. त्याने तोंडात लपविलेले पैसे आता त्याच्या खिशांत होते. त्याने खोटे बोलल्याबद्दल परीची क्षमा मागितली. परीलाही त्याची ही दशा पहावेना. तिने तीनदा टाळी वाजवली. त्याबरोबर लाकूड तोडणारे सुतार पक्षी तिथे येऊन दाखल झाले, आणि पिनोशिओच्या नाकावर बसले.

परीच्या आदेशानुसार त्यानी पिनोशिओचे वाढलेले नाक कापून काढले आणि त्याला पहिल्यासारखे केले. पिनोशिओला आनंद झाला. त्याने परीला मनःपासून



धन्यवाद दिले, आणि म्हणाला, " तुझ्यासारखी दयाळू परी शोधूनही सापडणार नाही."

परीही त्याच्यावर खुश झाली व म्हणाली, " तू सुद्धा चांगला मुलगा आहेस. तू आता इथच रहा. मी तुला माझा भाऊ मानीन. तू मला बहीण म्हण."

" एकदम कबूल पण माझे पप ! त्यांचे काय ?" पिनोशिओने विचारले.

" ती सर्व व्यवस्था मी केली आहे. तुझ्या वडलांना येथे येण्यासाठी निरोप गेला आहे. ते आज रात्रीपर्यंत येथे येतील." परीने सर्व काही सांगितले

" वा. वा. परीताई तू किती चांगली आहेस." पिनोशिओ टाळ्या वाजवून नाचू लागला.

" पण परीताई, मी माझ्या पपांना रस्त्यातच सामोरा जाईन म्हणतो. कारण फार दिवस झालेत त्यांना भेटून." पिनोशिओ म्हणाला.

" कांही हरकत नाही. तू जा. पण लक्षांत ठेव. हुशारीने रहा. रस्ता जंगलांतून जात आहे, हे विसरू नकोस." परीने त्याला जाण्याची परवानगी दिली.

पिनोशिओ पपांच्या स्वागतासाठी निघाला. रस्त्यात त्याला ज्या झाडावर फाशी दिले होते ते झाड लागले. तो जरा घाबरला. पण तसाच पुढे चालू लागला. इतक्यांत कुठून तरी काहीतरी वाजल्याचा आवाज आला. तो इकडे तिकडे पाहू लागला. तोच झाडी मधून मांजर बाहेर आले आणि दुसरीकडून कोल्हाही जवळ येऊन पोचला. कोल्ह्याने अगदी प्रेमाने विचारले, " अरे पिनोशिओदादा, तू इथे काय करतो आहेस." मांजराने तोच प्रश्न विचारून कोल्ह्याला साथ दिली,

" काही नाही बाबा. फार मोठ्या संकटात सापडलो होतो. तुम्ही त्या दिवशी रात्री मला एकटा सोडून

निघून आलात त्यावेळी डाकूंनी मला फार छळलं. माझ्या मोहरा ते माझ्यापासून घेण्याचा प्रयत्न करीत होते." पिनोशिओने सांगून टाकले.

"डाकू ? मोहरा चोरण्याचा प्रयत्न करीत होते काय ? फारच दुष्ट असावेत !" कोल्हा रागाने म्हणाला.

"हो फारच बदमाश असावेत ते." मांजराने री ओढली.

"काय सांगायच. त्यांनी पकडून मला फासावरहि टांगून टाकलं." पिनोशिओ.

"काय म्हणतोस ? खरच बुवा आता आपल्या–सारख्या चांगल्यांची, सज्जनांची दुनिया राहिली नाही." कोल्हयाने आपुलकी दाखविली.

"होय ना. आता काही भरवसाच राहिला नाही." मांजर.

बोलता बोलता पिनोशिओची नजर मांजराच्या एका पंजावर पडली. त्याचा पंजाच जाग्यावर नव्हता आणि ते लंगडतच चालत होतं.

"काय रे तुझा पंजा कुठे गेला." पिनोशिओने आश्चर्याने विचारले. पण मांजराजवळ या प्रश्नाला उत्तर नव्हते. पण कोल्हा लगेच म्हणाला, अरे, त्याला सांगायची लाज वाटत आहे. त्याच असं झालं. रस्त्याने आम्ही जात असताना एक भुकेलेला बोकड भीक

मागताना आम्हाला दिसला. त्याच या मांजराला फारच दया आली आणि त्यानं आपला एक पाय त्याला खायला दिला. अन् स्वतः लंगडत चालले आहे. "

पिनोशिओला त्याच्या त्यागाचं कौतुक वाटल. तो म्हणाला " वा, वा, आता उंदरांना जीवदान मिळेल.

" बरं ते जाऊ दे, तुझ्याजवळच्या मोहरा कुठ आहेत त्या तू पुरणार नाहीस का ?" कोल्ह्याने अधीरतेने विचारले.

" मोहरा तर माझ्याजवळ आहेत चारच शिल्लक आहेत. पण आज मी माझ्या पपांना भेटायला जाणार आहे मोहरा पुढे केव्हां तरी पुरू." पिनोशिओ म्हणाला.

" पुनः कधी ? तुला माहित नाही का ? ते मैदान कोण्या एका माणसाने आता विकत घेतले आहे. उद्यापासून तो कुणालाही मैदानावर येऊ देणार नाही. तेव्हा आजच चल थोड्याच वेळात चाराच्या दोन हजार मोहरा होतील. ते मैदान इथून दोन मैल अंतरावर तर आहे. " कोल्ह्याने अगदी गोड भाषण केले.

बिचारा पिनोशिओ लहान होता. तो परीने दिलेला सर्व संदेश विसरून गेला, आणि त्यांच्याबरोबर चालू लागला. पुनः तो या दोन्ही गुंडाच्या तावडीत सापडला बिचारा.

चालता चालता त्यांना एक नगर लागलं. त्या नगराच नांव होतं ‘ बंडलपूर ’ त्या गांवांत सगळेच बदमाश रहात होते. पशू, पक्षी सारेजण पक्के गुंड. त्या गावाजवळ एक मैदान होते.

“ हेच ते मैदान आता तू खड्डा उकर आणि त्यात मोहरा पुरून ठेवून तो खड्डा बुजून टाक.

पिनोशिओने कोल्हयाच्या सांगण्याप्रमाणे मोहरा पुरुन ठेवल्या. नंतर पाणी आणून त्याने खड्ड्यावर शिपडले.

कोल्हा म्हणाला, “ आतां आम्ही जातो. तू पण जाऊन थोड्या वेळाने परत ये. आणि झाडाच्या मोहरा घेऊन जा. ”

“ पिनोशिओला फार आनंद झाला. आतां आप–ल्याला दोन हजार मोहरा मिळणार व सगळे दारिद्रय नाहीसे होणार. या समाधानाने तो कोल्हयाला व मांजराला म्हणाला, “ मी तुम्हाला मोठे बक्षीस देईन.

“ नको नको. आम्हांला बक्षीस वगैरे कांही नको ´ आम्ही फक्त दुसऱ्याचे भले चिंतत असतो तुला लाभ झालेला पाहून आम्हांला आनंदच होईल. ” कोल्याच्या या भाषणाने बिचारा पिनोशिओ अगदी हुरळून गेला. त्या दोघांनीही पिनोशिओचा निरोप घेतला व ते निघून गेले.

## ६. प्राणसंकटे

सकाळ केव्हां उगवते असे पिनोशिओला होऊन गेले होते. त्याला अजिबात चैन पडत नव्हते. तो तसाच मैदानाकडे परतला. आणि एका झाडाखाली पहुडला. विचार करतां करतां त्याला झोप लागली. स्वप्नांत त्याला मोहरांच्या झाडाला हजारो मोहरा लागलेल्या दिसत होत्या. तो त्यांचा हिशोब करीत होता.

अखेर दुसरा दिवस उजाडला. गडबडीने उठून तो मैदानावरील आपले झाड शोधू लागला. तो मोहरा पुरलेल्या खड्ड्याजवळ गेला. पण तिथे त्याला झाड दिसले नाही. त्याला आश्चर्य वाटले. असं कसं झालं. तो विचार करू लागला. हे काय घडत आहे याचा त्याला उमज पडेना. इतक्यांत एका झाडावरून त्याला हसण्याचा आवाज आला. पिनोशिओ अधिकच नाराज झाला. झाडावर एक मोठा पोपट बसला होता. त्याचे पंख फडफडत होते.

"कारे बाबा हसतोस ?" पिनोशिओने विचारले.

"मी कुठ हसतोय. मी माझे पंख साफ करीत आहे. त्यामुळे मला गुदगुल्या होताहेत." पोपटाने हसत उत्तर दिले.

पिनोशिओला त्याच्या बोलण्याचे आश्चर्य वाटले. पण तो मुकाटयाने तेथून जवळच असलेल्या ओढयावर गेला. एका जोडयात त्याने पाणी भरून आणले आणि तो आपण पुरलेल्या मोहरांवर पाणी शिंपडू लागला. पोपटाला पुनः हसू आले. आता पिनोशिओला जरा रागच आला. तो म्हणाला, "तू फारच खडयाळ दिसतोस. अशाप्रकारे हसण्याच कारण काय ?"

"मला त्या मूर्खाच हसू येतय. ते दुसऱ्याच्या प्रत्येक गोष्टीचा विश्वास ठेवतात." पोपट म्हणाला,

"तुला माझ्याबद्दल काही म्हणायचे आहे काय?" पिनोशिओ.

"होय मला तुझ्याबद्दलच सांगावयाचे आहे. अरे तुला हे खर तरी वाटत कसं ? गहू–हरबऱ्याप्रमाणे मोह–राहि उगवतील !' पोपटाने प्रश्न केला.

"ए बाबा नीट सांग, कोडयासारखे सांगू नकोस. अगदी स्पष्ट बोल.' पिनोशिओ रडवलेला होऊन म्हणाला.

हे बघ. तू जेव्हां मोहरा पुरून फिरायला गेलास तेव्हां कोल्हा व मांजर इथे गुपचूप आले. त्यांनी खड्डा पुनः उकरला आणि तुझ्या मोहरा घेऊन ते पसार झाले. आतां कुणी जर त्यांना पकडू शकला तर मी म्हणेन की सगळ्या जगांत तो एकच हुषार माणूस आहे." पोपट म्हणाला.

हे ऐकून पिनोशिओला अचंबा वाटला. पण त्याचा पोपटावर विश्वास बसला नाही त्याने आपल्या हाताने खड्डा पुनः उकरण्यास सुरवात केली. खूप खोलावर खोदूनहि त्यात त्याला आपल्या मोहरा आढळल्या नाहीत.

त्याने धावत धावत जाऊन बंडलपूरच्या न्याया-लयांत फिर्याद दाखल केली. त्यावेळी न्यायासनावर एक केस पिकलेले म्हातारे माकड बसले होते. डोळ्या-वरील चष्म्यातून त्याने पिनोशिओकडे रोखून पाहिले. पिनोशिओने घडलेली हकीकत सांगून न्याय मागितला.

न्यायाधीश महाराजांनी लक्षपूर्वक त्याची कैफियत ऐकली. आणि नंतर त्यांनी घंटा वाजवून दोन शिपा-यांना बोलावले. दोन मोठे अजस्त्र कुत्रे शिपायाच्या वेशात हजर झाले. त्यांनी न्यायाधिशाला सलाम ठोकले.

" या पाजी माणसाच्या सोन्याच्या मोहरा चोरीला गेल्या आहेत. तरी ताबडतोब याला अटक करून जेल मध्ये ठेवावे." न्यायाधिशानी निकाल जाहीर केला.

आता मात्र पिनोशिओचा धीरच खचून गेला. त्या न्यायदानाचे त्याला आश्चर्य वाटले. पण काय उपयोग. त्याला चार महिन्याची शिक्षा झाली. कदाचित तो पुढेहि सुटला नसता. पण त्याच्या नशीबाने एक सुघटना घडली.

त्या नगराचा राजा एक मोठा विजय मिळवून स्वारीहून परत आला होता. त्या प्रीत्यर्थ अनेक कैद्यांना सोडून देण्यात आले. पण पिनोशिओला स्वतःची सुटका करून घेण्यासाठीं मिनतवारी करावी लागली. अखेर जेलरला दया येऊन त्याने पिनोशिओला सोडून दिले.

पिनोशिओ एकदम खूष झाला. आणि त्वरेने बंडलपूरच्या बाहेर पडला. त्याने ताबडतोब परीताईच्या घराची वाट धरली. पावसाळ्याच्या दिवसामुळे रस्त्यात चिखल झाला होता. तरीही पिनोशिओ चालतच होता. तो पपा आणि परीताई यांना भेटण्यासाठी उतावळा झाला होता. त्याला आता आपल्या कृत्याचा पश्चाताप होऊ लागला होता. आपण पपांचेही ऐकले नाही आणि परीताईचेही ऐकले नाही. उलट तिच्याशी खोटे बोललो

आपल्याला शिक्षा झाली ती योग्यच झाली. असे त्याच्या मनाने घेतले. आता कुणाशींही खोटं बोलायच नाही. परीताईचं नी पपांच ऐकायच असं त्याने मनाशी ठरवून टाकलं.

चालता चालता तो एकदम थांबला. रस्त्यात एक भला मोठा साप आडवा पसरला होता त्याच्या हालचालीमुळे व सुस्काऱ्यामुळे धूळ उडत होती. तो शेपटीने अधिकच धुराळा उडवीत होता. पिनोशिओ घाबरून एका जाग्यावर उभा राहिला. व साप निघून जाण्याची तो वाट पहात होता. असे तासा मागून तास निघून गेले. पण सर्पराज हलण्याची चिन्हे दिसेनात.

अखेर त्याने सर्पालाच विनंती केली, " सर्प महाराज आपण जरा मला वाट द्याल कां ?" परन्तु उत्तर नाही. हालचाल नाही. पुनः पिनोशिओने हात जोडून तोच प्रश्न केला. पण सर्पराज काहीच बोलले नाहीत. त्यांनी धूळ उडवायचे थांबवले आणि डोळे मिटले. बराच वेळ वाट पाहिल्यावर पिनोशिओला वाटले साप मेला. तो जवळ जाऊ लागला. इतक्यात सापाने आपले अक्राळ विक्राळ तोंड उघडले. धूळ उडवली आणि तो पिनोशिओच्या मागे धावू लागला. पिनोशिओ घाबरून पळू लागला आणि एकदम पाय

घसरून पडला व गडगडत गेला. तो एका चिखलाच्या डबक्यांत पडला. तसाच कसातरी तो उठला. त्याचे तोंड-शरीर सर्वच घाण झाले होते. त्याचा तो अवतार पाहून सर्पराजांना एकदम हसू लोटले. पिनोशिओ अधिकच घाबरला. त्याचे पाय लटपटू लागले. ते पाहिल्यावर सर्पराजाला आणखीनच हसू आले. त्याला ते आवरताहीं आले नाही तो इतक्या मोठ्याने हसू लागला की हसून हसून त्याची मुरकुंडी वळली. तरीही तो हसतच होता. अखेर हसण्याचा अतिरेक झाला. आणि सर्पराजाच्या छातीवरची शीर एकदम तुटली. त्यातून रक्त स्त्राव होऊन साप मरून पडला.

कसाबसा पिनोशिओ पुनः उठून उभा राहिला. खरोखरच साप मरून पडला याची खात्री पटल्यावर तो अगदी त्वरेने सापापासून दूर झाला आणि पुनः वेगाने चालू लागला. पण त्याला आता फारच भूक लागली होती. त्याला रस्त्यात द्राक्षांचा बाग दिसला. तो द्राक्ष तोडण्यासाठी पुढे झाला. पण त्याचा पाय कांटेरी जाळ्यांत अडकला. पिनोशिओ ओरडू लागला. पण रात्र असल्याने तिकडे कोणीच येईना. त्याने सुटण्याची धडपड केली. तो अधिकच गुरफटला. शेतकऱ्याने मुद्दामच जाळे लावून ठेवले होते. कारण त्याच्या कोंबड्या

रानमांजरे पळवीत असत. पिनोशिओ नेमका त्यांत अडकला. अंधारही खूप होता.

इतक्यात एक चमकणारा काजवा त्याच्या डोक्या-भोवती फिरू लागला.

पिनोशिओ काकुळतीने म्हणाला. " हे काजवे-भय्या, यातून मला कसे तरी सोडव. उपकार होतील. "

" पण यात तू कसा अडकलास ? " काजव्याने प्रश्न केला.

" मी द्राक्षे तोडायला आलो होतो. " पिनो.

" बाग तुझी आहे का ? " काजवा

" नाही. मला भूक लागली होती. " पिनो.

" म्हणून काय चोरी करायची अरे चोरी करू नये. " काजवा

" खर आहे तुमचं म्हणण. पण आता काय करू. " पिनो.

" चोरी करणाऱ्याला मी मदत देऊ शकत नाही. " असे म्हणून काजवा निघून गेला.

तोच कुणाच्या तरी पावलांचा आवाज आला. शेतकरी रानमांजर जाळ्यात सापडले आहे का हे बघण्यासाठी आला होता. पण तेथे एका मुलाला पाहून त्याला आश्चर्य वाटले.

" काय रे, तूच माझ्या कोंबड्या चोरून नेतोस होय ? बघतो तुझ्याकडे." शेतकरी रागाने म्हणाला. त्याला जाळ्यातून बाहेर काढून शेतकऱ्याने त्याला फर–फटत घराकडे नेले.

तेथे गेल्यावर शेतकरी म्हणाला, " उद्या सकाळी मी तुझ्याकडे पहातो. आजची रात्र तूं माझ्या कुत्र्याचे काम करायचेस. रात्री जर पाऊस पडला तर तू या डब्यांत शिरायचेस. नाहीतर इथेच पहारा करीत रहाचेस. रात्री रान मांजरे कोंबड्या पळवण्यास आली तर तूं भुंकून मला इशारा कराय–चास." असे बजावून सांगून शेतकऱ्याने पिनोशिओच्या गळ्यात कुत्र्याचा पट्टा बांधला, व त्याला साखळीला बांधून ठेवले.

बिचारा थंडीने कुडकुडत आणि भूकेने व्याकूळ झाला होता. त्याला तशीच दोन तास झोप लागली. कसल्या तरी आवाजाने तो जागा झाला. दोन रानमांजरे एक–मेकाशी बोलत होती. त्यांतले एक डब्याजवळ आले व हळू आवाजात हाक मारू लागले,

" नमस्कार मोलॅम्पो "

" माझ नांव मोलॅम्पो नाही. पण आज मी आज त्याचे काम करतो आहे. तुम्हाला काय हवयं !' पिनोशिओ म्हणाला.

" आम्ही रानमांजरे आहोत. आमचा व मोलॅम्पोचा समझोता होता."

" कसला समझोता पिनो."

" आम्ही कोंबड्या पळवायच्या त्यातली एक मोलॅम्पोला द्यायची. म्हणजे तो भुंकत नसे. व आम्हाला चोरी करून जाता येत असे." रानमांजराने खुलासा केला.

" असं होय मग ठीक आहे. आपण समझोता करण्यास तयार आहोत. मलाही भूक लागली आहे." पिनो उत्तरला.

त्या रानमांजराना आनंद झाला. ती चारी मांजरे खुराड्यात शिरली मात्र पिनोशिओने हळूच खुराड्याचे दार लावून घेतले आणि कुत्र्यासारखे भुंकण्यास सुरवात केली. थोड्या वेळाने बंदूक घेऊन शेतकरी बाहेर आला. पिनोशिओने समझोत्याची सारी हकीकत त्याला सांगितली. शेतकऱ्याला आज चार रानमांजरे एकाच वेळी सापडली त्यामुळे तो खूष झाला आणि एका मोकळ्या पिंजऱ्यांत त्याने ती मांजरे पकडून ठेवली. त्याने पिनोशिओची पाट थोपटली आणि खूष होऊन सकाळी पिनोशिओला सोडून दिले.

# ७. मेहनतपुर ते मूर्खनगरी

पिनोशिओ तेथून पळत सुटला. तो थेट परीच्या घराकडे निघाला. त्याला फाशी दिले ते झाड आले. तो पुढे गेला. पण काय होते तेथे. तेथे परीचा बंगलाच नव्हता, फक्त एक चबूतरा होता. त्यावर संगमरवरी दगड बसविला होता. त्यावर लिहिले होते.

"एका निळ्या डोळ्यांची परी येथे चिरशांती घेत आहे. आपला लहान भाऊ पिनोशिओ कुठे गेला हे न कळल्यामुळें रडून रडून तिला मरण आले.

पिनोशिओने त्या दगडावर आपले डोके आपटले व दगडाला कवटाळून तो रडू लागला. तो रात्रभर रडला. डोळ्यांतील पाणी पार आटून गेले. तरी तो रडतच होता. मुसमुसत होता. त्याची बहिण या जंगलाची राणी होती. त्यामुळें त्यालाही मान होता. आतां तो एकाकी पडला. त्याचे वडील जेप्पेत्तो यांचाही पत्ता नव्हता. दोघांचीही आठवण येऊन तो पुनः रडू लागला त्याचे सर्वस्व गमावले होते.

अत्यंत दुःखी मनाने आणि रिकाम्या हातांनी पिनोशिओ आपल्या घराकडे आला. त्याला पपांना भेटण्याची फार इच्छा होती. त्याने दार ठोठावले आणि हांका मारण्यास सुरुवात केली, " पपा ऽ अहो पपा ऽ! मी पुनः घरी आलो आहे. दार उघडा. "

पण घरांतून कसलाही आवाज येईना. घरांत कुणी नव्हतं. पपांच्या आठवणीने पिनोशिओ पुनः रडूं लागला. इतक्यांत एक कबूतर त्याच्याजवळ आलं.

" काय करतो आहेस ! तू इथें काय करीत आहेस ? " उगाच तू तुझा वेळ घालवीत आहस " कबूतर म्हणाले.

" मग काय करणार? माझे पपा कुठे बाहेर गेले आहेत."

" अरे जेपेत्तो तुझे पपा ? तुझे नांव पिनोशिओ आहे काय ?" कबूतर

" होय. आपण माझ्या पपांना ओळखता " पिनो.

" हो तर. अरे खूप दिवस त्यांनी तुझी वाट पाहिली. ( संबंध देशभर तुझा शोध केला ) आणि नंतर त्यांनी एक मोठी होडी बनवली. ती घेऊन तुला शोधण्यासाठी ते समुद्र मार्गाने निघाले." कबूतराने सांगितले.

"तो समुद्र किनारा इथून किती दूर आहे" पिनो.

"शंभर मैल. पण हरकत नाही. तू माझ्या पंखावर बैस. मी तुला तिकडे नेऊन सोडतो." कबूतर प्रेमाने म्हणाले.

पिनोशिओ कबूतराच्या पंखावर बसून समुद्रकिनाऱ्याकडे निघाला. मजल दरमजल करीत ते दोघेजण दुसरे दिवशी समुद्राच्या किनाऱ्याकडे पोहोचले.

किनाऱ्यावर खूप माणसे जमा झाली होती. समुद्रावर तुफान वादळ चालले होते. माणसे आपापसात बडबडत होती. पिनोशिओने तेथे चौकशी केली, तेव्हा त्याला समजले, आपल्या मुलाला शोधण्यासाठी एक म्हातारा गृहस्थ होडीतून समुद्रपार चालला होता. आता होडी वादळात सापडली आहे. नीट दिसत नाही.

पिनोशिओ एका उंच भागावर उभा राहिला. त्याने समुद्रावर दूरपर्यंत नजर टाकली. त्याला होडी दिसली. आपल्या पपांना त्याने बरोबर ओळखले. त्याने हातवारे करून त्यांना खुणा केल्या. पपांनीही त्याला ओळखले. व इषारा देऊन त्यांनी आपली होडी पुनः समुद्र किनाऱ्याकडे वल्हविण्यास सुरवात केली पण

पाण्याची एक प्रचंड लाट आली. अन् जेप्पत्तो होडीसहित दिसेनासा झाला. किनाऱ्यावरील लोकांनी

खूप शोधाशोध केली. पण शेवटी सर्वजण निराश होऊन परतू लागले. ते म्हणत होते.

" ईश्वर त्याला शांती देवो "

पिनोशिओला फार दुःख झाले. त्याने एकट्यानें पपांचा शोध करण्याचे ठरविले. त्याने निर्धारानें पाण्यांत उडी घेतली. लोक हळहळू लागले. बिचारा बुडून मरणार.

पण पिनोशिओ लाकडाचा होता. तो पाण्यावर तरंगू लागला. सारखा तो पोहतच होता. तो अजि-बात थांबायचे नाही असे त्याने ठरविले होते. रात्रं-दिवस शोध करायचा. पावसांतही तो पोहतच होता. त्याला दूरवर एक किनारा दिसला. तिकडे चौकशी करावी म्हणून तो किनाऱ्याकडे निघाला. बऱ्याच वेळाने तो किनाऱ्यावर पोहोंचला. त्याने किनाऱ्या-वरूनच समुद्रावर पहाण्यास सुरूवात केली. समुद्रावर कुठे नाव दिसते आहे कां? पण छे. कुणाला तरी विचाराव म्हणून तो इकडे कुणी भेटते कां पाहूं लागला. पण तिकडे सर्वत्र शुकशुकाट होता. पिनोशिओ निराश झाला.

इतक्यांत एक मासा पाण्यावर तरंगत असलेला त्याला दिसला. तो चेहऱ्यावरून भयानक दिसत होता.


पण मनाने प्रेमळ होता. भीतभीतच पिनोशिओने त्याला प्रश्न केला, " मत्स्यदेवा, तुम्हांला एक प्रश्न विचारूं ? "

" एक का दोन विचार. " प्रेमळ शब्दांत मासा म्हणाला.

" इथे जवळपास एखादं गांव आहे कां, की जिथे जीव धोक्यात न घालतां मला खायला मिळेल ? " पिनो.

" हो. आहे की. इथून अगदी सरळ नाकासमोर जा. म्हणजे तुला गांव दिसेल. " मासा म्हणाला.

" दुसरे असे की तुम्ही रात्रंदिवस समुद्रात फिरता. एका लहानशा नावेत बसलेले माझे पपा तुम्हाला दिसले कां कुठें ? "



" कसे आहेत तुझे वडील " माशाने विचारले.

"माझे पपा सर्व जगांत फार चांगले आहेत. आणि मी सर्वात वाईट मुलगा आहे." पिनो.

"असंही असू शकेल की त्यांची नाव बुडाली असेल आणि एखाद्या मोठ्या माशाने त्यांना गिळले असेल इथें फार मोठे मासे आहेत. ते रेल्वेची इंजिनेही गिळू शकतात. इतकेच काय पण पांच मजली घरही गिळू शकतील माशाचे हे बोलणे ऐकून पिनोशिओने कपाळावर हात मारून घेतला आणि तो सरळ गांवाकडे निघाला.

तो त्या गावात येऊन पोहोचला. त्या गावाचे नाव होते 'मेहनतपूर' तेथील सर्व माणसे काम करीत होती. कुणालाच बोलायला वेळ नव्हता. जो तो आपल्या कामांत गर्क होता. पिनोशिओला काही सुचेना. कुणाजवळ मागावे अन्न ! या विचारात तो होता. इतक्यात समोरून एक कोळशेवाला येताना दिसला. तो दयाळू वाटत होता.

पिनोशिओ त्याच्याजवळ गेला आणि त्याने त्याला दोन पैसे देण्याची विनंती केली गाडीवाल्याने दोन पैसे देण्याचे कबूल केले पण गाडी ढकलण्यास मदत कर म्हणून सांगितले. हे असले हलके काम करणे त्याला पसंत नव्हते. तो पुढे भीक मागण्यासाठी गेला. परंतु

प्रत्येकवेळी त्याला हाच अनुभव आला. काम केल्या-शिवाय कोणीही दाम देईना. प्रत्येकाने म्हटले-

'तुला भीक मागायला शरम नाही वाटत. काम कर.'

एक बाई पाण्याच्या बादल्या भरून नेत होती. पिनोशिओने तिच्याकडेही याचना केली. पाणी पिण्यास मागितले. ती बाई स्वभावाने चांगली होती. तिने त्याला पाणी दिले. पाणी प्याल्यावर तो धीराने म्हणाला,

"माझी तहान तर भागली. अशीच जर माझी भूक भागेल तर !

ती स्त्री हसत म्हणाली, "असं होय. तू ह्यातली एक बादली माझ्या घरी घेऊन चल. मी तुला पोटभर खायला घालेन." वास्तविक पिनोशिओला लाज वाटत होती. पण नाइलाजे त्याने ते काम स्विकारले.

तिने घरी गेल्यावर त्याला पोटभर जेवायला वाढले पिनोशिओ जेवणात अगदी मग्न होऊन गेला होता. इतका वेळ त्याने जेवणापलीकडे कुठेही लक्ष दिले नाही. आता मात्र त्याचे लक्ष त्या दयाळू स्त्रीकडे गेले. त्याचा हात तसाच जाग्यावर राहिला. एकदम त्याने तिचे पाय धरले. तो ओक्साबोक्शी रडू लागला. पण तू मला भेटलीस.

"हो, हो," ती म्हणाली.

"तू मला ओळखलं नाहीस. मी तुझ्याकरतां किती तरी रडलो." आता त्या स्त्रीलाहीं एकदम रडू कोसळलं.

ती आता मोठी झाली होती. पिनोशिओच्या आई सारखी ती वाटत होती. तिने त्याच्या डोक्यावरून हात फिरविला.

"ताई तू इतकी मोठी कशी झालीस. मी तर आहे तसाच आहे." पिनोशिओने विचारले.

"तू कसा मोठा होशील? कठपुतळे वाढत नाहीत." परीताईने त्याची समजूत घातली.

"पण ताई, मला हे जीवन नको आहे. मनुष्य व्हायचे आहे." पिनोशिओ रडत म्हणाला.

"पण तू माणूस होणार कसा! तू तर मोठ्या माणसाच ऐकत नाहीस. खर बोलत नाहीस. अभ्यास करत नाहीस. काम करीत नाहीस." परीताईने माणसाचे गुण सांगितले.

"ताई, हे बघ मी आता तुझ्याजवळ रहातो. मी खूप काम करीन. घराची झाडलोट करीन. पाणी भरीन आणि ---!"

"हे बघ तुला शाळेत जाऊन खूप अभ्यास करायचा असेल तरच इथे रहा!" परीताई म्हणाली.

दुसऱ्या दिवसापासून पिनोशिओ शाळेत जाऊ लागला. खूप अभ्यास करण्यास त्याने सुरवात केली. त्याच्या वर्गात कांही खोडकर मुले होती. कठपुतळा आपल्या वर्गात आहे, याचा फायदा घेऊन थट्टामस्करी टवाळी करून त्याचा छेड काढण्यास सुरवात केली. एके दिवशी मधल्या सुट्टीत तर त्याच्या शाळेतील खोडसाळ मुलांनी कहर केला. त्यांनी त्याला घेरला. आणि



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ........ दि..........
क्रमांक ........ नोंद दि..........

टिंगल करण्यास सुरवात केली. तू काही खरा मुलगा नाहीस ! आता मात्र पिनोशिओ गप्प बसणे शक्यच नव्हते. त्याने एका लाथेच्या तडाख्याने दूर भिरकावले, दुसऱ्याला एका ठोशासरशी उलथे पालथे केले अन् तिसऱ्याला दूर ढकलून दिले. त्याचा रुद्रावतार पाहून सारेजण भयभीत झाले. आणि त्यांनी त्याचा नाद सोडला. सर्वांनी विचार केला आता त्याच्याशी मैत्री केलेली बरी. पुनः त्याच्याशी शत्रूत्व नको. सर्व जण त्याचे मित्र बनले. शिक्षकही त्याला नावजू लागले. शिक्षकांनी त्या उनाड मुलांची संगत सोडण्याबद्दल पिनोशिओला सांगितले. पण त्याने ऐकले नाही.

एके दिवशी रस्त्यात पिनोशिओला त्याचा मित्र सिंकिया भेटला. "अरे, समुद्रावर एक कुत्रामासा आला आहे. चल आपण पहायला जाऊ"

"नको गुरुजी रागावतील." पिनो म्हणाला.

"हूऽ! अरे ते दरमहा पगार घेतात. आपल्याला काय करायचय. अरे, तिथे रोज सुट्टी असते. ते ठिकाण फार सुरेख आहे. तेथे कसलेही काम नसते. असते खेळायचे. फक्त खेळ. चल." सिंकिया म्हणाला पिनोशिओ खेळण्याच्या कल्पनेने हुरळून गेला. पण त्याच मन अजूनही तयार होत नव्हतं.

इतक्यात तिकडून एक गाडी आली. मोठी मजेशीर गाडी होती ती. त्या गाडीला बारा गाढवे जुंपली होती. प्रत्येक गाढवांनी माणसे घालतात तसले बूट पायांत घातले होते. गाडीला चिंध्या गुंडाळून शोभा आणली होती. गाडीवान खूप उंच पण जाडजूड होता. त्याचा आवाज मांजराप्रमाणे होता. गाडीत चिक्कार गर्दी होती. फक्त मुलेच होती त्यात. ती गाडी मूर्ख–नगरला जात होती. सिक्रियाने गाडी थांबवली. तो स्वत: गाडीच्या टापावर बसला. आणि पिनोशिओ उडी मारून गाढवावर बसला.

"कसाही असो. अभ्यासाने माझे अगदी डोके उठले होते." पिनोशिओ मनाशी म्हणाला,

"मूर्ख कुठला." गाढव पुटपुटले.

"काय रे गाढवा, तुला बोलता येते?" पिनोने विचारले.

"मला बोलता येते आणि रडताही येते. तूही लवकरच रडशील. आणि शाळा चुकल्याबद्दल तुला पश्चाताप होईलच तुझ्यावर प्रेम करणाऱ्या माणसांना सोडून आल्याबद्दल दु:खही होईल."

परन्तु गाढवाचे हे म्हणणे त्यानें मनावर घेतले नाही. त्यानें विचार केला या गाढवाला काय कळतय ? जेव्हां गाडी त्या आश्चर्यकारक मूर्खनगरीला येऊन

पोहोचली तेव्हां पिनोशिओला खूप आनंद झाला. तेथे सर्व मुलेच मुले होती. ती सगळी जण सारखी खेळत होती. मौज करीत होती. त्याना रोजच सुटी होती. पिनोशिओ त्यांच्यात सामील झाला. खेळू लागला, नाचू लागला, उड्या मारू लागला. तो आता त्या परी-ताईला आणि जेप्पेत्तोला पूर्णपणे विसरला होता. त्या मैदानावर फक्त खेळच खेळ चालले होते.

"असे कित्येक महिने तो खेळ खेळत राहिला."

त्या गांवांत फक्त खेळच चालू असत. मुले रात्रं-दिवस खेळत दंगा करीत. त्याना खेळताना त्रास होऊ नये म्हणून सर्वत्र कडक पहारा करीत होते. मातीचे शिपाई पहारा करीत होते. रस्त्यावर ठिकठिकाणी सार्वजनिक फलक लावले होते.

"खा, पी, मजा करा."

"गणित शिकणार नाही"

"शाळा बंद करा"

"शिकणे-लिहिणे मुर्दाबाद"

"मूर्खनगरी झिन्दाबाद"

त्या घोषणांवरून पिनोचा वेळ तेथे कसा जात असेल याची सर्वांना कल्पना आलीच असेल. सदैव खेळण्यात तो आपला वेळ घालवी.

## ८. गाढवाचा नाच



होता होता अशीच एक सकाळ उजाडली. पिनो उठला आणि त्याने सहज आरशात पाहिले. तो काय आश्चर्य. त्याला गाढवासारखे लांब कान उगवले होते.

त्याला वाईट वाटले. त्याने आपल्या मित्राला गाठले सिकीयालाही तसेच झाले होते. हात पायाला खूर उगवले होते. शेपूट फुटली होती. दोघांनाही रडू आले. पण काय करणार ? त्यांचा आवाजहि गाढवासारखा येत होता.

इतक्यांत गाडीवान तेथे आला. त्याने दोघांच्याही पाठीवरून हात फिरवले व म्हणाला.

" वा. आता तुम्ही छान गाढव झालात."

ते दोघे खरोखरच गाढव झाले. हाताचे पाय झाले. चार पायावर ते उभे राहिले. गाडीवानाने त्यांना विकण्यासाठी बाजारात नेले. थोड्या वेळात दोघांचाहि सौदा करून गाडीवान परत फिरला. पिनोशिओ गाढवाला एका सर्कसच्या मालकाने विकत घेतले होते. गाडीवान जादूगार होता. तो मुलांना गाढवे बनवून विकत असे. त्यावरच तो श्रीमंत झाला होता.


पिनोशिओला आता पश्चाताप होऊ लागला. पण उपयोग काय ? मालक त्याला सर्कसचे नवे नवे खेळ शिकवीत असे मार देत असे. जनावरांचे खाणे त्याला मिळू लागले.

एक दिवस सर्कशीची जाहिरात करण्यांत आली. ' गाढवाचा नाच ' हे सर्कशीचे मोठे आकर्षण होते. सर्क-

शीला चिक्कार गर्दी लोटली. सर्कशीची वेळ झाली. मालकाने एक कार्यक्रम करून गाढवाच्या कामाला सुरवात झाली. हवेत एक चाबूक उडवून मालकाने आज्ञा दिली.

'सगळ्यांना नमस्कार कर.'

गाढवाने गुडघे टेकून नमस्कार केला. टाळ्या पडल्या. सावकाश चालून दाखव. गाढवाने चालण्यास सुरवात केली. मालकाने गाढवावर बंदूक रोखली गाढव एकदम खाली पडले. पुनः टाळ्यांचा कडकडाट



झाला. गाढवाच्या अभिनयावर सर्वजण बेहद्द खूष होते मालकाने गाढवाला पळण्यास सांगितले. पळता पळता

गाढवाची नजर एका ठिकाणी स्थिर झाली. ते थांबले एका ठिकाणी एक सुन्दर मुलगी बसली होती. तिच्या गळ्यात ताईत होता. त्यावर कठपुतळ्याचे चित्र होते. पिनोशिओ-गाढवाने आपल्या परीताईला बरोबर ओळखले. तो तिला हाका मारू लागला. लोकांना त्याच्या ओरडण्याची मजा वाटली. मालकाने चाबकाचे फटकारे ओढले. गाढव पळू लागले. पळताना ते एकदम पडले. त्याचा एक पाय मोडला.

सर्कशीच्या मालकाला राग आला. त्या लंगड्या गाढवाचा आता काही उपयोग नव्हता. त्याने ते विकायचे ठरविले. पण घेणार कोण ? शेवटी एका ढोल-वाल्याने ते वीस पैशास विकत घेतले. त्याच्या कातड्याचा चांगला ढोल होईल. म्हणून तो त्याला घेऊन गेला. त्याने गाढवाच्या गळ्यांत धोंडे बांधले व त्याला समुद्राच्या पाण्यांत बुडविले. पाण्यांत बुडून गाढव मेल्यावर तो त्याचे कातडे काढणार होता. गाढवाच्या गळ्यांत दोरी बांधून दुसरे टोक त्याने आपल्या हातात धरले होते.

बऱ्याच वेळाने गाढव मेले असेल असे त्याला वाटले. त्याने दोरी वर खेचली पण गाढवाऐवजी

९२२९० IRBK-0112290